# अनुक्रमणिका

**प्रकरण ११ – संस्कृति** ........ १

ऐतिहासिक परंपरा व सांस्कृतिक वारसा ........ १

संत परंपरा ........ २

कीर्तनकार व प्रवचनकार ........ ५

साहित्य व साहित्यिक ........ ६

नाट्यक्षेत्र ........ २१

संगीत — वादन ........ २७

शाहिरी ........ २८

तमाशा ........ ३१

गोंधळ ........ ३२

क्रीडाक्षेत्र ........ ३३

शिल्पकला व चित्रकला ........ ३५

# प्रकरण ११ - संस्कृति

**स**मष्टी जीवनाला पोषक गुणसमुच्चय हे संस्कृतीचे अंत:स्वरूप, तर उपभोग्य वस्तूंची विविधता व विपुलता हे संस्कृतीचे बाह्यस्वरूप होय. प्रस्तुत प्रकरणात सातारा जिल्ह्याच्या संस्कृतीचे मूल्यमापन भौतिक संचिताच्या आधारे न करता कला आणि विचारधनाच्या संचितावरुन केलेले आहे. त्यात जिल्ह्याची ऐतिहासिक परंपरा व लाभलेला सांस्कृतिक वारसा, संत परंपरा आणि साहित्य, संगीत, रंगभूमी, शिल्पकला, लोककला, क्रीडा इत्यादी कलाविष्कारांची माहिती दिली आहे.

## ऐतिहासिक परंपरा व सांस्कृतिक वारसा

जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागातील अति पर्जन्य, निबिड अरण्य, सह्याद्रीच्या रांगांनी व्याप्त डोंगराळ भूमीमुळे प्राप्त निसर्गसिद्ध सुरक्षितता आणि कृष्णा, कोयना व माणगंगा नद्यांचे खोरे या भौगोलिक पार्श्वभूमीवर येथील सांस्कृतिक जीवन फुलले असून जिल्ह्याला गौरवशाली इतिहासाचा वारसा लाभलेला आहे. प्रागैतिहासिक काळातील पुरातत्त्वीय अवशेष सातारा जिल्ह्यात उपलब्ध झाले आहेत. कृष्णा-कोयना खोऱ्यातील हा भूभाग प्रारंभिक ऐतिहासिक काळात इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकापासून ते इसवी सन आठव्या शतकापर्यंत राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या समृद्धीच्या शिखरावर होता. या जिल्ह्यातील करहाटकचा उल्लेख भारहूत शिलालेखात व कुडा येथील बौद्ध गुंफा लेखात आला आहे. हा प्रदेश सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव, बहमनी , मुघल, मराठे व ब्रिटिश शासकांच्या अंमलाखाली होता.

येथील लोक फलटणचे महानुभाव पंथीय पंचकृष्ण, माण देशाच्या पठारावरील शंभू महादेव, महाबळेश्वराप्रमाणेच म्हसवड सिद्ध, रेवण सिद्ध, खरसुंड सिद्ध या नाथपंथी सिद्धांचे साधक तसेच औंधची यमाई, प्रतापगड निवासिनी श्री तुळजाभवानी तथा श्रीराम वरदाईनी पूजक आहेत. तसेच त्यांनी श्री गणेशपंचायतन, चाफळचा श्रीराम, समर्थाचा मारुती व रामदासी पंथ, औंदुंबरचे श्री. दत्तात्रय आणि त्रिपुटीचे गोपालनाथ इत्यादी सांप्रदायिक निष्ठा जपल्या आहेत.

मराठा साम्राज्याची ही राजधानी होती. शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी. येथे छत्रपती शाहू महाराज (संभाजींचा मुलगा), छत्रपती रामराजा, छत्रपती प्रतापसिंह यांनी राज्य केले. छत्रपती प्रतापसिंह हे साताऱ्याचे शिल्पकार व समाजसुधारक होते. [याबाबत अधिक माहिती प्रकरण दोन मधील इतिहास "आधुनिक काळ" यात दिली आहे.] राजमाता सुमित्राराजे भोसले या अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संस्थांच्या आधारस्तंभ आहेत. नि:स्पृह न्यायबुद्धीने नावलौकिक मिळविलेले रामशास्त्री प्रभुणे, नाना फडणवीस, औंध संस्थानाधिपती भवानराव तथा बाळासाहेब पंत प्रतिनिधी, वेदशास्त्रसंपन्न अनंताचार्य नारायणाचार्य गजेंद्रगडकर, वेदमुर्ती भाऊशास्त्री गोडबोले, समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर, साहित्यसम्राट न.चिं. केळकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, क्रांतिसिंह नाना पाटील, दादासाहेब उंडाळकर, किसन वीर, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, प्राज्ञ पाठशाळेचे संस्थापक रामशास्त्री मराठे तथा केवलानंद सरस्वती, विश्वकोशाचे निर्माते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, भारताचे माजी सरन्यायाधीश प्र. बा. गजेंद्रगडकर, अच्युत बळवंत कोल्हटकर, चिंतामणराव कोल्हटकर, शां.गो. गुप्ते, आचार्य काका कालेलकर, श्री. म. माटे. कवी

यशवंत, बा. सि. मर्ढेकर, प्रा. शिवाजीराव भोसले, बॅ. पी. जी. पाटील, पुरातत्वज्ञ म. न. देशपांडे व प्रा. ना. स. फरांदे अशा कितीतरी व्यक्तींचा [ही यादी प्रतीकात्मक असून परिपूर्ण असेलच असे नाही.] सातारा जिल्ह्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक घडणीत सिंहाचा वाटा आहे. आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचे वास्तव्य अल्पकाळ सातारा जिल्ह्यात होते. [कुशलदेव शंकरदेव वडवलकर, "महर्षी दयानंद का अज्ञात दुर्लभ संस्कृत पत्र", **"वेदवाणी"**, मासिक पत्रिका, डिसेंबर, १९९०.]

वेदविद्येचे व संस्कृतीचे दक्षिणेतील ज्ञानपीठ अशी प्रतिष्ठा मिळविलेल्या वाईनेही जिल्ह्यातील सांस्कृतिक परंपरेत भरघोस योगदान दिले आहे. वैदिक परंपरेत संस्कृत साहित्य व शास्त्र शिकविणाऱ्या प्राज्ञ पाठशाळेचा यात सिंहाचा वाटा आहे. येथील अनेक पंडितांनी संस्कृत, व्याकरण, न्याय, वेदांगे यांचा अभ्यास करून वाद व चर्चेद्वारे आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. [प्राज्ञ पाठशाळेत आचार्य विनोबा भावे यांनी एक वर्ष **उपनिषद, गीता, ब्रह्मसुत्र भाष्य, मनुस्मृती, न्यायसुत्र** इत्यादी ग्रंथांचा अभ्यास केला होता. प्राज्ञ पाठशाळेची अधिक माहिती या ग्रंथातील प्रकरण १०- "सामाजिक सेवा" मध्ये पहावी.] प्राज्ञ पाठशाळेचा **धर्मकोश** [जसवंत नानजकर, **लोकहित** (संपा. जयवंत गुजर), मे १९९२, पृ. ९७ लुई रेनॉ या फ्रेंच पंडिताने धर्मकोशाची प्रशंसा करताना म्हटले आहे की, "वाईसारख्या आडगावामध्ये, विद्यापीठापासून दूर असलेल्या, खाजगी अनुदानावर चरितार्थ करणाऱ्या एका भारतीय संस्थेकडून एवढा कठीण ग्रंथ प्रकाशित होतो याचे युरोपियन प्राच्य विद्याविषारदांना आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही".] हा भारतीय संस्कृती, सामाजिक मानवशास्त्र, धार्मिक संकल्पनांची उत्क्रांती अशा ज्ञानविषयाचा एक मूलभूत साधनग्रंथ आहे. प्राज्ञ पाठशाळेतील प्रज्ञाशोध विभागाद्वारे सर्वच धर्मशास्त्रांचा अभ्यास करण्यात येतो. येथील लोकमान्य टिळक व वसंत व्याख्यानमाला या संस्थाही सांस्कृतिक संवर्धनात कार्यरत आहेत. जिल्ह्यातील जखीणवाडी, आगाशिव, पांडवगड येथील बौद्ध लेणी आणि पाटेश्वर (ता. सातारा) येथील शैव लेणी प्राचीन कलेचा तर वाई, माहुली, धावडशी, शिखर-शिंगणापूर, सातारा, कराड येथील मंदिरे मराठा शिल्प शैलीचे [याची सविस्तर माहिती या ग्रंथातील प्रकरण १२ "प्रेक्षणीय स्थळे" मध्ये दिली आहे.] नमुने आहेत. येथे मराठा शैलीतील भित्तिचित्रकला विकसीत झाली. येथील मंदिरातून कथा, कीर्तने व प्रवचने यांच्या माध्यमातून संस्कृतीचा प्रसार झालेला दिसतो. तसेच संगीताची परंपराही जोपासली गेली. संस्कृतीच्या सर्वांगाची माहिती या प्रकरणात स्वतंत्रपणे दिली आहे.

## संत परंपरा

महाराष्ट्रात उदयास आलेल्या महानुभाव पंथातील पंचकृष्णांपैकी तिसरा अवतार चांगदेव राऊळ अथवा चक्रपाणी सातारा जिल्ह्यातील फलटण (पूर्वीचे फलेठाण) चा होय. त्याने पुढे योग सामर्थ्याने देहत्याग करून भडोच येथील हरपाळदेवाच्या मृत देहात प्रवेश करून नवीन अवतार धारण केला. त्याचा हा अवतार म्हणजेच महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर होते. [शं. गो. तुळपुळे, **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड पहिला, पृ. २०१-०३.] जिल्ह्यात महानुभाव पंथाचा आरंभापासूनच प्रभाव आहे. तेराव्या शतकातील महानुभाव वाङ्मययात फलटणचा उल्लेख फलीठाण असा आढळतो.

सन १९१२ मध्ये साताऱ्याला बाबा मोतीवाले यांनी महानुभाव मठाची स्थापना केली. ज्ञानदेवापासून तुकारामापर्यंत महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले. संत सखू त्या परंपरेतील अगदी अलीकडचा दुवा. संत सखूचे सासर कराडचे. सासुरवासास कंटाळून पंढरपूरला जाणाऱ्या दिंडीत ती सहभागी झाली व विठ्ठलाच्या ठिकाणी असलेली तिची अनन्यसाधारण भक्ती तिला संतत्वाला नेती झाली. कराडमध्ये कृष्णेकाठी विठ्ठल-रखुमाई मंदिरासमोर संत सखूचे समाधिमंदिर आहे. संत सखुच्या करुण रसाचे साहित्य कुठे उपलब्ध नसले तरी परंपरेने चालत आलेला संत सखूच्या नावावरचा एक अभंग सांगितला जातो.

अनुक्रमणिका

धाव देवा, देवा धाव । किती घेऊ विठ्ठल नाव
सासूबाई मारी लाथ । सुटे संसार हातोहात
देवा एकच आळवणी । तुझे पाव जीवा धणी ॥

संत सखूचे एक गीत डॉ. के. वा. आपटे यांनी अलीकडेच उजेडात आणले असून या गीतात "विठ्ठलाच्या चरणी सखू झाली मनोरथ" असे म्हटले आहे. [शं. गो. तुळपुळे, **मराठी वाङमयाचा इतिहास**, पृ. ७३५.]८

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा ॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा । गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥ १ ॥

यामुळे सर्वदूर परिचीत असलेले रामदासी पंथ आणि प्रत्यक्षपणे स्वत:च योग्याची मुर्तीमंत साक्ष असलेले रामदास यांनी खालील श्लोकात योग्याचे वर्णन केलेले आहे.—

नसे गर्व आंगीं सदा वीतरागी । क्षमा शांती भोगी दया दक्ष योगी ॥
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा । यहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥
मनाचे श्लोक ॥ १३४ ॥

रामदास स्वामी हे सज्जनगडावर वास्तव्यासाठी राहीले. महाराष्ट्रात इसवी सनाच्या १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात समर्थ रामदासांचे कार्य आणि शिकवण यातून प्रवर्तित झालेला रामदासी पंथ, तथा समर्थ संप्रदायाची सज्जनगड व चाफळ ही दोन प्रमुख स्थाने होत. शिवरायांच्या राजकारणाला धर्मकारणाचे अधिष्ठान देणारे रामदास (मूळ नाव —नारायण ठोसर, जन्म—१६०८, जालना जिल्ह्यातील जांब येथे) सज्जनगडावर वास्तव्यासाठी आले. राम व हनुमान या प्रमुख देवता असून ब्रम्हचर्यव्रत, संन्यस्त वृत्ती, उदंड भ्रमण व भिक्षावृत्ती या त्यांच्या संप्रदायातील शिष्यत्वाच्या खुणा आहेत. आंध्र प्रदेशात इंदूरबोधन व दक्षिणेत तंजावरपर्यंत त्यांचे मठ होते. तेथवर रामदासी संप्रदायाचा प्रसार पोहचला होता. माघ वद्य ९ शके १६०३ (२ फेब्रुवारी १६८२), शनिवार रोजी सज्जनगडावर रामदासांनी देह ठेवला. त्याचवर्षी संभाजीने समर्थाचे समाधिमंदिर बांधले. रामदास स्वामी, जयराम स्वामी वडगावकर, रंगनाथ स्वामी निगडीकर, केशवस्वामी नगरकर व आनंदमूर्ती ब्रम्हनाळकर तथा रघुनाथ पंडित या कवि पंचकास दास पंचायतन म्हणत. [न. र. फाटक, **रामदास वाङमय आणि कार्य**, मुंबई, १९७०, पृ. ३८१.]९

या पंचायतनातील शंकराचार्याच्या **अपरोक्षानुभव** या ग्रंथावर मराठीमध्ये भाष्य लिहिणारा पहिला संत जयराम स्वामी (इ. स. १५९९-१६७३). [जयराम स्वामी रामदासांच्या आधी जन्मले व त्यांच्या आधी समाधिस्त झाले. पण रामोपासनेशी संबंधित असल्याने त्यांचे नाव या पंचायतनात आले.] त्यांचा वडगावला (खटाव तालुका) मठ आहे. हा मठ शिखर-शिंगणापूरचे वीरशैव संत शांतलिंग स्वामीच्या परंपरेतील आहे. रंगनाथ स्वामी निगडीकर हे रामदासाचे समकालीन होते.

छत्रपती शाहूचे राजगुरू ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर (मूळ नाव विष्णू, जन्म-१६४९, मृत्यू-१७४५) मूळचे औरंगाबाद जिल्ह्यातील दुधड गावचे देशस्थ ब्राह्मण कुटूंबातील. त्यांनी काशीच्या ज्ञानेंद्रस्वरस्वतीकडे (अंदाजे १६७२-७३) अध्ययन केले. ज्ञानेंद्रसरस्वतीने त्यांना परमहंस ही दीक्षा देऊन ब्रम्हेंद्रस्वामी असे नामाभिधान दिले. सन १७२८ मध्ये त्यांचे धावडशी येथे आगमन झाले. परंपरागत चार

अनुक्रमणिका

आश्रमांव्यतिरिक्त जीवनमुक्ताश्रम हा पाचवा आश्रम त्यांनी सांगितला. स्वामी केवळ देवधर्म करणारे तपस्वी वा साधुपुरूष नव्हते तर राजकारण, समाजकारण, धर्मकारण व अर्थकारण करणारे राष्ट्रपुरूषही होते. देणगी, वर्षासन, इनामगावे याद्वारे प्राप्त झालेली संपत्ती धार्मिक व लोकोपयोगी कार्यासाठी खर्च केली.

ज्योतिसंपत महाभागवतांनी (जन्म-बुधमलवडी, मूळघराणे-खटावचे, मृत्यू-शके १७१९) वाई, माहुली, पाटस, कराड वगैरे ठिकाणी मंदिरे बांधली. त्यांची समाधी चिंचणेरला आहे. तत्कालीन सातारा जिल्ह्यातील विटेगावचे चैतन्य संप्रदायी साधुकवी भैरव, अवधूत ज्ञानसागर तथा ज्ञानसागरेंद्र स्वामीचा वीटे येथे मठ आहे. ते शके १७६५ मार्गशिर्ष कृष्ण त्रयोदशीस समाधिस्त झाले. त्यांनी **ज्ञानसागर** हा अध्यात्मपर ओविबद्ध ग्रंथ रचिला.

जिल्ह्यात गोंदवले येथील रामदासी संप्रदाय व रामभक्तीच्या प्रसाराबरोबर गरीबांना अन्नदान करणारे सत्पुरूष गोंदवलेकर महाराजाचे (इ. स. १८४४-१९१३) मूळ नाव गणपतरावजी घुगरदरे (देशस्थ ब्राह्मण) होते. त्यांचे गुरू तुकाराम महाराज येहळीकर तथा तुकाराम चैतन्य हे होते. गुरूंनी त्यांचे नाव ब्रह्मचैतन्य ठेविले. त्यांनी तीन वेळा भारत यात्रा करून लोकजीवन व जनमानसाचे निरीक्षण केले व सदाचार, नामस्मरण, सगुणोपासना, प्रेमभाव व अन्नदान हा सामान्य प्रापंचिकांना पेलेल असा परमार्थ मार्ग दाखविला. सन १८९० पासून वास्तव्य गोंदवले येथेच होते. श्रीराम भक्ती हे महाराजांचे जीवन आणि काव्यरचना प्राण होता. त्यांनी गोंदवले व अनेक ठिकाणी राममंदिरे उभारली. ते साध्या सुलभ भाषेत अभंगरचना करीत. त्यांचे आनंदसागर, ब्रम्हानंद, डॉ. कुर्तकोटी स्वामी हे प्रमुख शिष्य होत.

साताऱ्याचे दत्तभक्त कृष्ण रावजी मुळे (इ. स. १८६४-१९२४) तथा विष्णुदास महाराजांनी नित्यानंद सरस्वतीकडून संन्यास दीक्षा घेतली व पुरुषोन्तमानंद सरस्वती नाव धारण केले. त्यांनी देवदेवतांविषयी अनेक रचना केल्या. खटाव तालुक्यातील पुसेगाव येथील जुनागडचे राजपूत-क्षत्रिय कुलवंत अवधूत पंथी श्री सेवागिरी महाराजानी (१९०५ मध्ये आगमन) लोकांना दया, सत्य, न्याय व वैऱ्यावरही प्रेम करण्याची शिकवण दिली. मार्गशिर्ष वद्य चतुदर्शी शके १८६९ (सन १९४७) मध्ये त्यांचे महानिर्वाण झाले.

पाटण तालुक्यातील नाटोशीचे अनंत तथा दादा महाराज किर्लोस्कर हे सुद्धा (इ. स. १९०१-१९७०) दत्तभक्त होते. नियमित श्रीसेवा व प्राणायाम युक्त सो ऽ हं जपाचे चिंतन यावर त्यांचा भर असे. इ. स. १९५१ पासून त्यांनी अनुग्रह देण्यास सुरूवात केली. तपसाधना करणारे श्रीधर स्वामींचे (इ. स. १९०८-१९७३, मूळ गाव वेगलुर) वास्तव्य काही काळ सज्जनगडावर होते. त्यांनी १९३० मध्ये कर्नाटकात जाऊन समर्थांचे चरित्र व कार्य आणि प्रवचनांद्वारे धर्मजागृती केली. इ. स. १९३५-१९४० या काळात गडावरील वास्तव्यात विपुल ग्रंथरचना केली. इ. स. १९४६ मध्ये संन्यास घेतला व १९६० पर्यंत धर्मप्रसारासाठी भारतभर भ्रमण केले. १९६० ते १९७२ बारा वर्षे मौन, तपश्चर्या व एकांतवास केला. गडावर श्रीधरकुटी आहे. संत सखू नंतरचे विठ्ठलभक्त वारकरी संप्रदायी मारूतीबुवा कराडकर होत. सुमारे १५० वर्षापूर्वी भागवत संप्रदायाचे मूळपीठ म्हणून कराडला मारुतीबुवाच्या मठाची स्थापना झाली. या मठाने वारकरी समाजाचे संघटन केले.

अनुक्रमणिका

याशिवाय मायणीचे यशवंतबुवा, फलटणचे उपळेकर महाराज, साताऱ्याचे उतेकर महाराज, त्रिपुटीचे गोपालनाथ महाराज इत्यादींनी या भागातील जनसामान्यांना भक्तीमार्गाची शिकवण दिली. संतांच्या साहित्याविषयीची माहिती साहित्य व साहित्यिक या विभागात पुढे दिली आहे.

## कीर्तनकार व प्रवचनकार

महाराष्ट्रात ज्ञानेश्वरापासून प्रवचन, पुराण, कीर्तन व भजनांद्वारे उद्बोधन आणि रंजन साधले जात आहे. प्रवचनकार हे प्राथ: व्युत्पन्न पंडित असत. मूळ संस्कृ त श्लोकाच्या आधारे ते अध्यात्म निरूपण करीत. पुराणिक हे **गीता, भागवतादी** ग्रंथांच्या आधारे पुराण निरुपण करतात. तसेच उत्सव प्रसंगी व एकादशीसारख्या व्रतदिनी मठ-मंदिरांमध्ये टाळमृदुंगाच्या साथीनिशी भजनाचा कार्यक्रम करतात. कीर्तन हे तत्कालीन साहित्य प्रसाराचे प्रभावी साधन होते.

वडगावचे जयरामस्वामी हे प्रभावी कीर्तनकार होते. आनंदमूर्ती ब्रम्हनाळकर यांच्या काही पदरचना प्रसिद्ध असून ते उत्तम कीर्तने करीत. कराडचे विठोबा अन्ना दप्तदार यांची मराठी व संस्कृत काव्यरचना कीर्तनकारांना माठे वरदान ठरली. "श्रीरंगा दे मजला सत्संगा" हे पद खूपच लोकप्रिय झाले होते. कीर्तनाला वाहून घेतलेली कराडची सोमवार पेठेतील देव व शुक्रवार पेठेतील श्रोत्री ही घराणी प्रसिद्ध होती. सुप्रसिद्ध शहीर हैबतीही कीर्तने करी. त्याने दहा-बारा वर्षे नाथपंथी साहित्याचे व **महाभारतातील** गजगौरी विराट पर्व, **रामायणातील** सीताहरण इत्यादी विषय अभ्यासले व त्यावर बहारदार कवनेही केली. तो आपल्या कीर्तनात तत्वज्ञान व कथा यांचा सुरेख मेळ घाली. कृष्णाजी रावजी धांदरफळे तथा विष्णुदास महाराज लहानपनापासूनच भजने व किर्तने करीत.

वाई शहराच्या मध्यवस्तीत सरदार रास्ते यांनी बांधलेल्या महाविष्णु मंदिरात पूर्वी नेहमी चातुर्मास, अधिक मास व एकादशीस कीर्तने व प्रर्वचने केली जात. कृष्णोत्सवात वाईस नामांकित कीर्तनकार येत. नारायणबुवा गोगटे व पिलुबुवा फलटणकर यांची धर्मपुरी घाटावर अनेक वर्षे नित्यनेमाने कीर्तने होत. कडेकरबुवा, काशीकरबुवा व राष्ट्रीय कीर्तनकार दत्तोपंत पटवर्धन यांचीही कीर्तने होत. डॉ. पटवर्धन प्रसिद्ध वारकरी विष्णुबुवा जोग यांच्या संस्काराने प्रभावित होऊन कीर्तने करू लागले. कीर्तनाद्वारे ते राष्ट्रोद्धाराचे कार्य करीत. स्वदेशी चळवळीचे ते पुरस्कर्ते होते. त्यांची वाणी स्वच्छ, आवाज गोड व वक्तृत्व प्रभावी होते. लोकमान्य टिळकही त्यांच्या कीर्तनास येत. सतत ४० वर्षे महाराष्ट्रात कीर्तनातून स्फूर्ती देणारे पटवर्धन वाईचे. बाळकृष्ण चौंडे महाराजांनी (जन्म १८७७) वयाच्या १५ व्या वर्षापासून अध्यात्मिक कीर्तनास सुरूवात केली. ते गायकही होते. काशीपासून रामेश्वरपर्यंत भक्ती व गोसेवेचा त्यांनी प्रचार केला. औंधचे भवानराव तथा बाळासाहेब पंत प्रतिनिधी स्वत: आख्यान रचित. ते उत्तम कीर्तनकार होते. त्यांची कीर्तने अत्यंत परिणामकारक व प्रभावी होत. प्रतिवर्षी शिवजयंतीस व वडील श्रीनिवासराव यांच्या पुण्यतिथीस (भाद्रपद शु. १४) अशी दोन कीर्तने ते स्वत: करीत. औंधच्या दरबारी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हरिदास मंडळीतील फलटणकर, नारायणबुवा गोगटे, मसूरचे काशीनाथ बुवा, साताऱ्याचे ठाकूरदास बुवा इत्यादी नामांकित (हरिदास) मंडळींचे वरचेवर होणाऱ्या कथा प्रवचनांमुळे पंत प्रतिनिधींच्या कलाभिरूचीचा विकास झाला.

याशिवाय गोविंदस्वामी आफळे, बाळासाहेब साठे, भाऊराव जोशी, त्रिंबकबुवा रामदासी, राशिनकरबुवा, कोपरकरबुवा, काका देवधर, रामचंद्रबुवा कराडकर, सावदेकर गुरूजी, गोविंदराव मटंगे

इत्यादी कीर्तनकार आणि राघुअण्णा धोपाटे, पागनीस गुरूजी इत्यादी प्रवचनकार उल्लेखनीय आहेत. वारकरी संत परंपरेतील सदगुरु दादा महाराज सातारकर हे कीर्तनकारापेक्षा ज्ञानेश्वराचे प्रवचनकार म्हणून प्रसिद्ध पावले. अद्वैतात सुद्धा भक्ती असते हे त्यांनी ज्ञानेश्वरीच्या आधारे पटवून दिले. त्यांनी सुशिक्षित वर्गाला ज्ञानेश्वरीची गोडी लावली. सन १९२७ मध्ये महाराजानी साताऱ्याला कीर्तन, प्रवचन शिकविण्याचा उपक्रम सुरू केला. या उपक्रमात त्यांनी नामपर, स्थितीपर, संतपर, पंढरीपर, उपदेशपर, करूणापर आदी विषयांवर एकुण १५३ कीर्तने करविली. सन १९३० ते १९४० च्या दरम्यान पुणेकरांना त्यांनी आपल्या कीर्तनांनी व प्रवचनांनी वेड लावले. सरदार मेहेंदळे, सरदार आबासाहेब पुरंदरे, बॅ. परांजपे, सरदार विंचूरकर, न. चिं. केळकर, वामन मल्हार जोशी आदि त्यांचे नित्याचे श्रोते होते. त्यांच्या पश्चात सन १९४६ नंतर आप्पा महाराजांनी १९६२ पर्यंत ही परंपरा चालविली. आप्पा महाराज एकनाथी भागवताचे उत्कृष्ट वक्ते म्हणून गाजले. सन १९६२ नंतर परंपरा दादा महाराज सातारकरांचे नीळकंठ ज्ञानेश्वर गोरे तथा बाबा महाराज सातारकर चालवित आहेत. त्यांनी **भागवत, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव** ग्रंथांचे अध्ययन पूर्ण करून परमार्थिक व वारकरी संप्रदायाची बैठक पक्की केली. **ज्ञानेश्वरीच्या** प्रसारासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश तसेच परदेशातही (अमेरिका, इग्लंड-१९८६) **ज्ञानेश्वरीच्या** प्रवचनांचे अखंड कार्यक्रम केले. त्यांची अस्खलीत रसाळ वाणी संत वाङ्मयावरील अगाध प्रभूत्व,स्पष्ट, परखड व विनोदप्रचुर भाषा यामुळे कीर्तन-प्रवचनात श्रोत्यांची मने ते सहज जिंकतात. त्यांची **दादा महाराज सातारकर संप्रदायिक भजनमाला** (१९६४), **दादा महाराजांची जीवनगाथा** (१९७४), **पंचपदी भजनमाला** (१९८४), **संप्रदायिक हरिपाठ भजन** (१९८४), **भावार्थ दीपिका नित्यपाठ** (१९८४), **पंढरी वाटचालीचे भजन** (१९८६), **स्वानंद जीवन** (१९८७) आणि **ऐश्वर्यवती ज्ञानेश्वरी** ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

कीर्तन-प्रवचनाबरोबरच बाबा महाराजांनी १९८३ मध्ये जनसेवेसाठी स्थापन केलेली चैतन्य भागवत संप्रदाय प्रसार संस्था महाराष्ट्र पातळीवर सामाजिक कार्य करीत आहे. ही संस्था वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, पंढरपूर वारीच्या वाटेने अन्नदान, विनामूल्य वैद्यकीय तपासणी व औषधे पुरविते.

## साहित्य व साहित्यिक

प्रस्तुत विवेचनासाठी जिल्ह्यातील साहित्यिक कुणास म्हणावे हा विवाद्य मुद्दा लक्षात घेता जन्म, वास्तव्य व प्रत्यक्ष साहित्य निर्मितीस्थान या निकषांनुसार ज्यांचा जिल्ह्याशी संबंध असेल त्यांचा येथे नामोल्लेख केला आहे. तसेच या जिल्ह्यात जन्मलेले परंतु इतरत्र वास्तव्य केलेले आणि इतरत्र जन्मलेले परंतु जिल्ह्यात वास्तव्य करुन साहित्य निर्मिती केलेल्या साहित्यिकांचाही उल्लेख केलेला आहे. जिल्ह्याचा साहित्यिक वारसा कथन करणे हा हेतू असल्याने येथील प्रत्येक साहित्यिकाचा उल्लेख असेलच असे नाही. शिवाय अधिकृत कागदपत्रे किंवा पुरेसे आधारसाहित्य उपलब्ध होवू शकले नाही. तेव्हा विविध स्तरांवर ही माहिती प्राप्त केलेली असल्याने त्यात त्रुटी संभवतात. पुरातन काळातील शिलालेखांत व ताम्रपटात प्रचलित अर्थाने साहित्यिक मूल्य नसले तरी मराठी लेखनकलेच्या दृष्टीने त्यास फार महत्त्व आहे. राजपुरी (ता. जावळी) येथील सोमनाथ मंदिराचा इतिहास कथन केलेला शिलालेख इसवी सन दहाव्या-अकराव्या शतकातील मराठी देवनागरी लिपीतील आहे. [**शां. भा. देव**, महाराष्ट्र व गोवे शिलालेख-ताम्रपट वर्णनात्मक संदर्भसूची, पृ. ३१२.]

सांस्कृतिक इतिहासात साहित्याच्या निर्मितीस विलक्षण महत्त्व असून समाजाच्या संस्कृतीचे प्रतिबिंब त्या त्या काळातील साहित्यात पडणे अपरिहार्य आहे. तद्वत्त्व साहित्याचा समाजावर अंतर्बाह्य संस्कार घडणे देखील स्वाभाविक आहे. ही धारणा मान्य केल्यावर सातारा जिल्ह्यात मध्ययुगीन-मराठा कालखंडात राष्ट्रीयत्वाची जाणीव करुन देणारे समर्थ रामदास (सन १६०८-८२), रामदास पंचायतनातील जयरामस्वामी वडगावकर (सन १५९९-१६७३) व रंगनाथस्वामी निगडीकर (सन १६१२-१६८४), वामन पंडित, निरंजनस्वामी (सन १६३७-१७२७), कृष्णदयार्णव कोपर्डेकर (सन १६७४-१७८०), विठोबा अण्णा दप्तरदार (सन १८१४-१८७३), गोंदवलेकर महाराज (सन १८४४-१९१३), तुकाविप्र (मृत्यू १७८८), आत्माराम बुवा चरेगावकर इत्यादी संत प्रवृत्तीच्या साहित्यिकांचा उल्लेख क्रमप्राप्त आहे. संत सखू ही याच कालखंडात होऊन गेली. परंतु तिचे साहित्य उपलब्ध नाही. स्थानिक लोकांकडून तिची रचना ऐकावयास मिळते. त्या काळी परमेश्वराच्या भक्तीचे साधन म्हणून साहित्याकडे पाहिले जाई. याच कालखंडात आपल्या काव्यसुधेने रसिकांना रमविणारे आणि अध्यात्मिक विचारांची गुंफण करणारे शाहीर गोविंदसागर, गोपालनाथ, संगम भाऊनाथ, हैबती, संभू राजू, पठ्ठे बापूराव तसेच शृंगारिक रचना करणारा सगनभाऊ होऊन गेला. या कालखंडात संत वाङ्मयाचा प्रभाव दिसून येतो. त्यात पद्यात्मक वाङ्मयाची निर्मिती प्रामुख्याने दिसते. राजाश्रयामुळे महाकाव्य व बखरीसारख्या रचनाही झालेल्या दिसतात. संत साहित्यातील शिकवण व विचारांचा प्रचार कीर्तन, प्रवचन, भजनांद्वारे केला जाई.

त्यानंतर १९ व्या शतकात नवजागरणाच्या काळात ज्येष्ठ समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले (सन १८२७-१८९०), गोपाळ गणेश आगरकर (सन १८५६-१८९५), न. चिं. केळकर (सन १८७२-१९४०), महादेव शिवराम गोळे, पंडित विष्णु परशुराम शास्त्री (१८२७-१८७६), श्री. म. तथा बापूसाहेब माटे (सन १८८६-१९५७), चिंतामण गं. भानू (सन १८५६-१९२९), वासुदेव बळवंत पटवर्धन (सन १८७०-१९२१) आदींचा उल्लेख क्रमप्राप्त ठरतो. या कालखंडात पद्यात्मक साहित्याचा प्रभाव कमी होऊन निबंध प्रवृत्तीचे वैचारिक वाङ्मय व संशोधनात्मक साहित्य निर्माण झाले. गद्य साहित्यात कादंबरीकार लक्ष्मणशास्त्री हळबे व ना. ह. आपटे, इतिहास संशोधन रा. ब. पारसनीस, म. मा. कुंटे, मराठी कोशकार रघुनाथ भास्कर गोडबोले, भाऊशास्त्री लेले, वासुदेवशास्त्री अभ्यंकर (सन १८६३-१९४२), कृ. ना. आठल्ये, वि. व. पंडितासारख्या साहित्यिकांचा उल्लेख क्रमप्राप्तच आहे.

सन १९२० नंतरच्या कालखंडात कविता, नाटक, कथा-कादंबरी समीक्षण, नवकाव्य आदि वाङ्मयाला बहर आला. या कालखंडातील कवी गिरीश, यशवंत, बा. सि. मर्ढेकर, स्वामी केवलानंद म्हणजेच नारायण शास्त्री मराठे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ग. ह. खरे, यशवंतराव चव्हाण, कीर्तनकेसरी तसेच कवी व नाटककार गोविंदस्वामी आफळे, नाटककार बाळ कोल्हटकर व शां. गो. गुप्ते, ग. स. अळतेकर व पु. पां. गोखले, श्री. के. क्षीरसागर, समीक्षक शंकर सारडा, शाहिरी वाङ्मयाचे अभ्यासक डॉ. शिवाजीराव चव्हाण, **उपराकार** लक्ष्मण माने, प्रा. शिवाजीराव भोसले, आबासाहेब शिंदे अशा कितीतरी नामवंताचा उल्लेख करता येईल. विविध वाङ्मयीन साहित्याचा परामर्ष घेताना ही यादी परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

खटाव तालुक्यातील कुंभारगावच्या चैतन्य संप्रदायी अंबरनाथांनी "अर्जुनगर्व परिहार" या काव्याची रचना केली. शिवाजी महाराजांच्या काळी सातारा येथे तुकाब्रह्मानंद यांनी भृतहरीची **तीन शतके** व **गीतगोविंद** यावर समश्लोकी रचना केली तसेच **शंकरभाष्यटीका** व **वेदांत रहस्याची** रचना करुन कवी व भाष्यकार म्हणून ख्याती मिळविली. **हरिहर ऐक्याचे** प्रतिपादन करणारा मराठीतील पहिला लिंगायत कवी

अनुक्रमणिका

शांतिलिंग (शिखर-शिंगणापुरला त्याचा मठ आहे.) याने **विवेक चिंतामणी** हा ग्रंथ निजगुणशिवयोगी यांच्या कन्नड ग्रंथावरुन रचला. यात लिंगायत आचार-विचारांचा संग्रह आहे. **करणहुसगे** हा त्याचा दुसरा ग्रंथ होय. त्याच्या **शांतबोध** या अपूर्णावस्थेतील ग्रंथात ब्रह्म, माया या विषयांचा उहापोह केला आहे.

समर्थ रामदासांचा जन्म या जिल्ह्यातला नसला तरी वास्तव्य सज्जनगड व चाफळ येथे होते. चाफळ, सज्जनगड व शिवथरघळ (रायगड जिल्हा) ही त्यांची लेखनाची ठिकाणे मानली जातात. त्यांच्या काव्यात निसर्गाचे अप्रतिम वर्णन आलेले आहे. समर्थ रामदासानी अपार लेखन केलेले आहे. समर्थ केवळ निवृत्तिमार्गी संत नव्हते, तसेच ते केवळ अध्यात्माच्या व परमार्थाच्या मार्गात गुंतून पडलेले नव्हते. त्यांचे प्रारंभिक काळातील थोडेसे लेखन सोडल्यास बाकीचे सारे लेखन उपदेशकाच्या भूमिकेतून झालेले आहे. समर्थांचा **दासबोध** ही अनेक वर्षांच्या व्यासंगातून, चिंतनातून आणि अवलोकनातून साकारलेली वाङ्मय निर्मिती होय. त्यांनी शिवरायांचा केलेला गौरव पाहता असे म्हणता येईल की, तो केवळ धार्मिक ग्रंथ नसून समाजकारण आणि राजकारण यांचा संपूर्ण विचार त्यात आहे हे त्यांनी शिवाजी महाराजांविषयी संभाजी महाराजांना पाठविलेल्या पत्रावरुन स्पष्ट होते (हे पत्र परिशिष्टात दिले आहे). सतराव्या शतकात महाराष्ट्रास आवश्यक असलेले आत्मिकबळ, आत्मविश्वास व निर्भयपणा हे गुण जोपासण्याची आवश्यकता त्यात सांगितली आहे. ते कृतिप्रेरक साहित्याचे पहिले प्रणेते होत. शिवाजी महाराजांसह लक्षावधी मराठी भाविकांत त्यांनी नवचैतन्य निर्माण केले. या ग्रंथात ७,७५१ ओव्या आहेत. सन १९०५ मध्ये शं. श्री. देवांनी कल्याण स्वामीनी स्वहस्ते लिहिलेली दासबोधाची प्रत प्रसिद्ध केली. समर्थांनी **दासबोधाची** रचना चाफळास येऊन राहिल्यावर म्हणजे १६४४ नंतरच्या पहिल्या ५-६ वर्षात केली असावी असे स. ख. अळतेकरांचे अनुमान आहे. **परचक्र निरुपण, अस्मानी सुलतानी** सारख्या काव्यांतून (प्रकरणांतून) समकालीन राजकीय, सामाजिक स्थितिचे विदारक चित्र त्यांनी रेखाटले. रामदासांची दुसरी महत्त्वाची रचना म्हणजे **रामायण** (सुंदरकांड १११ श्लोक व युद्धकांड १,३६२ श्लोक) व **आनंदवन भुवन** (५९ ओव्या) हे काव्य होय. तसेच त्यांची **करुणाष्टके, मनाचे श्लोक** (२०५ श्लोक), गणपतीची "सुखकर्ता दुख:हर्ता" व शंकराची "लवथवती विक्राळा" या आरत्या व मारुतीच्या "भीमरुपीमहारुद्रा" स्तोत्रासारख्या स्फूट रचना महाराष्ट्रात घरोघरी लोकप्रिय आहेत. त्यांनी विविध रागात बांधलेल्या पदांवरुन त्यांचा संगीताभ्यास होता हे लक्षात येते. रामदासांच्या लेखनामागे संस्कृतातील ग्रंथाध्ययनाची बैठक होती असे दिसते. मराठी प्रमाणेच त्यांनी हिंदीतही अनेक पदे रचली. गिरधर स्वामी, वेणाबाई, अक्काबाई, आदिंना समर्थांपासून प्रेरणा मिळून ते समर्थ शिष्य बनले.

समर्थांचा **दासबोध** ग्रंथ महाराष्ट्राची आधुनिक काळातील गीता होय, असे ज.स. करंदीकर **श्रीसमर्थचरित्रात** म्हणतात. त्यात प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधला आहे. सध्या व्यवहारी चातुर्याबरोबर राजकारणातले चातुर्यही त्यात उपदेशिले आहे. **दासबोध** व इतर रामदास वाङ्मयात तर्कशुद्ध विचारसरणी व साहित्यसौंदर्य यांचे हृद्य मिलन झाले आहे. सृष्टीचे व मानवी व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण त्यात प्रतिबिंबित झाले आहे. समर्थांचे **दासबोधा** खालोखाल **मनाचे श्लोक** प्रसिद्ध आहेत. या मनोबोधात उदात्त नीतिबोध, भक्तिमाहात्म्य, अद्वैताचे तत्त्वज्ञान आणि प्रभू राम हा भक्तांचा तारणहार असल्याची भक्तीभावना आहे. त्यांच्या पंचवीस प्रश्न व पंचीकरणादी अभंग या स्फूट काव्यात सुमारे २५० अभंग आहेत. ''पंचीकरण'' हा विषय सृष्टीच्या उत्पत्तीशी संबंधित आहे. हे अभंग म्हणजे समर्थांचे सहजोद्गार आहेत. या स्फूट काव्यात शंभर ओव्यांची एक अशी चौदा ओवीशते असलेले समर्थांचे एक प्रकरण आहे. यात परमार्थाची स्पष्ट शिकवण आहे. साधूंची लक्षणे, विवेक-वैराग्य, सगुण-निर्गुण, ध्यान इत्यादी विषयांचे सहजसुंदर निरूपण यात आहे. तर ''आत्माराम'' हे प्रकरण समर्थांच्या सर्व

अनुक्रमणिका

अध्यात्मप्रकरणात सरस आहे. या प्रकरणात समर्थांनी इहलोक सोडून जातेवेळी आपल्या शिष्यांना उद्देशून जे शेवटचे उद्‌गार काढले त्याचा उल्लेख आलेला आहे. ते एक पूर्ण बोधाचे दिव्य रसायन आहे. चतुर्थमान, पंचमान, जनस्वभाव गोसावी, पंचसमासी, सप्तसमासी, जुनाट पुरुष व त्याची कन्या, षड्रिपुनिरूपण, पंचीकरण योग, इत्यादी स्फुट प्रकरणांतून त्यांनी भक्ती, नीती व आत्मनिवेदनस्थिती यांचे विवरण केलेले आहे. पंचीकरण योगात मूळ मायेचे स्वरूप दाखविले आहे. समर्थांच्या **करूणाष्टकांमध्ये** करूणामय स्तोत्रे आहेत. ती अष्टकेच आहेत असे नाही. त्यात काही पंचके व दशकेही आहेत. श्लोकसंख्येचा त्यात नियम नाही. ही करूणाष्टके फार लोकप्रिय आहेत.

रामदासांचे समकालीन जयरामस्वामी वडगावकर मूळचे नगर जिल्ह्यातील मांडवगणच्या भिकाजीपंत देशपांड्यांचे पुत्र. त्यांची पूर्वीपासून अध्यात्माकडे प्रवृती असल्याने ते पंचवटी व जोगाईचे आंबे येथे काही काळ अनुष्ठान करून नंतर पंढरपूरला गेले व तेथून वडगावला आले. त्यानंतर त्यांचे वास्तव्य वडगावलाच होते. वडगावच्या मठाचे ते अधिपती होते. त्यांनी १६४८ मध्ये **दशमस्कंधटीका** (ओवी संख्या ९,९५९), १६५४ मध्ये **सीतास्वयंवर** (२,०४९ ओव्या), **रूक्मिणीस्वयंवर** (ओव्या ४,४४०) आणि १६६९ मध्ये **अपरोक्षानुभव** (१,७८० ओव्या) हे ग्रंथ रचले. त्यांचे जीवन व परंपरा सांगणारी बखरही प्रसिध्द आहे. याखेरीज **शांतिपंचीकरण**, **ज्ञानीभक्तसंवाद** वगैरे लहान लहान पुस्तिकाही त्यांनी लिहिल्या असून काही पदे व अभंगही रचले आहेत. शंकराचार्यांच्या **अपरोक्षानुभूती** या ग्रंथावरील टीका म्हणजे त्यांच्या मराठीतील **अपरोक्षानुभव** हा ग्रंथ होय. या ग्रंथाच्या उपसंहारात शास्त्रविचार जपणारे पंडीत व ब्रम्हनिष्ठ भक्त यांच्यातला भेद सांगितला आहे. ते प्रभावी कीर्तनकारही होते. आनंद संप्रदायी व रामदास पंचायतनातील दुसरे संत रंगनाथस्वामी निगडीकर (मूळ आडनाव-खडके) हे निगडी गावचे. त्यांनी **गजेंद्रमोक्ष, रामजन्म, गुरुगीता, सुदामचरित्र, शुकरंभासंवाद, पंचकरण, भानुदासचरित्र, गरूड, सत्यभामागर्वहरण, बध्दमोक्षविवरण,** इत्यादी ग्रंथ आणि पदे लिहिली. या खेरीज **योगवसिष्ठसार** हा ग्रंथ त्यांचाच असावा. तथापि, दत्तो वामन पोतदारांच्या मते हा एकनाथकालीन रंगनाथ मोगरेकरांचा असावा. रंगनाथाची रचना प्रासादिक आहे. आपल्या काव्यातून ते कथा साधनेलाच साध्य मानून आत्मकळा विसरणाऱ्या साधकाला उपदेश करतात तर कधी खरे ज्ञान, धन व सौख्य यांचे स्वरूप सांगतात. त्यांच्याच घराण्यात पुढे श्रीधर पंडित हे कवी झाले. त्यांचे **रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप** इत्यादी धार्मिक ग्रंथ आजही लोकप्रिय आहेत. त्यांचे वास्तव्य पंढरपूरला असे. रहिमतपूर निवासी तुकाराम भगवंत विपट तथा तुका विप्र (सन १७२९-१७९१) हे रंगनाथस्वामी निगडीकरांचे समकालीन. त्यांनी पदे, अभंग, आरत्या, स्तोत्रे अशा विविध स्फुट रचना केल्या आहेत. त्यांनी **आत्मसिंधु, सुदामचरित्र, कालिया मर्दन, भानुदास चरित्र, आरती कीर्तनरंगाची** इत्यादी ग्रंथ लेखन केले. वाईस काही काळ वास्तव्य असलेले रमावल्लभदास तथा तुकोपंत राळेरासकर (सन १६०९-१६६८) यांनी शंकराचार्यांच्या **बृहव्दाक्यवृत्ती** ग्रंथावर **वाक्यवृत्ती** नामक मराठी टीका लिहिली. या शिवाय **दशमस्कंधाच्या** आधारे **कृष्णकथा** लिहिली. त्यांनी **गीतेवर चमत्कारी** नामक टीका लिहिली. याशिवाय त्यांचा **गुरुवळी, गुरुमहिमा, प्रबोधचंद्रिका, संतनामावळी, वैष्णवगती** असे ग्रंथ आहेत. खटावच्या ज्योतिसंपत दादा महाभागवतांनी **भागवत** ग्रंथावर ओवीबध्द तशीच श्लोकबद्ध टीका लिहिली. खटाव तालुक्यातील खतगूण गावचे संत तुका पांडुरंगदास (सन १७२२-१७५३) यानी **गीतेचा** अभंगात्मक अनुवाद करताना मूळातील आशय सुलभतेने स्पष्ट करण्यात कौशल्य प्रगट केले आहे. यांनी **गीतेच्या** सातशे श्लोकांचा अनुवाद सातशे अभंगांमध्येच केला आहे. सातारा जिल्ह्यातील उंब्रज येथील कचेश्वर ब्रह्मे (जन्म-चाकण, जि. पुणे, मृत्यु-१७३१) यांचे शिष्यत्व छत्रपती शाहू महाराजांनी स्वीकारले होते. संत तुकारामास ते गुरु मानत. त्यांनी **सुदाम चरित्र** (१०३ श्लोक) व **गजेंद्रमोक्ष** (९५ श्लोक) ही आख्याने तसेच स्वतःचे आत्मचरित्रही लिहिले. **भागवताच्या दशमस्कंधावरील** टीकात्मक

**हरिवरदा** नामक ग्रंथ लिहिणारे तसेच **दत्तजननोत्साह** व **विचार-चंद्रिका** ग्रंथकर्ते कृष्णदयार्णव (मूळ नाव नरहरी, सन १६७४-१७४०) कराड जवळील कोपर्डेचे. संत एकनाथ, गोविंद गुरू व भागवत ही त्यांची श्रध्दास्थाने होती. त्यांनी **तन्मयानंदबोध** व **चिन्मयानंदबोध** ची रचना केली. निरंजनस्वामी कराडकर (सन १६३७-१७२७) आणि विठोबा अण्णा दप्तरदार (सन १८१३-१८७३) हे कराडचे कवी. निरंजनस्वामीनी **गणेशगीतेवर** टीका लिहिली. आपल्या अभंगवाणीने निजामी मुलखापर्यंत आपला संप्रदाय विस्तारला. त्यांचा पुत्र रत्नाकर याची काही पदे आणि नातू भगवंत देव याने लिहिलेले **निरंजनस्वामीचे** चरित्र उपलब्ध आहे. विठोबा अण्णा दप्तरदाराचे मराठी व संस्कृत काव्य कीर्तनकारांना उपयोगी ठरले. त्यांनी **सुश्लोक लाघव** या संस्कृत ग्रंथाव्यतिरिक्त **पद्यरत्नमाला** व **सत्पलाघव** ही गद्य टीका लिहिली. रामभक्त असल्याने रामभक्तीवर अनेक पद्यरचना मराठीतून केल्या आहेत. वरील ग्रंथांव्यतिरिक्त त्यांनी **गजेंद्रचंपू, हेतुरामायण, प्रबोधोत्सवलाघव, साधुपार्यदलाघव** इत्यादी संस्कृत ग्रंथही लिहिले आहेत. कराडच्या रामचंद्र दैवेज्ञांच्या **छंदोमंजिरी** या ग्रंथात ९२ वृत्तांची सोदाहरण माहिती आहे. त्यांचे शिष्य गोविंद बाळकृष्ण दीक्षितांनी (सन १७८३-१८५४) **मंजूषा, तरंगिणी, कालप्रबोधोदय, एकादशी प्रकाश** हे ग्रंथ लिहिले. तर प्रत्येक तिथीची स्मृति नी पौराणिक कृत्ये समजवून देणारा **तिथितत्व** हा ग्रंथ (१७४४) कराडच्या यज्ञेश्वर ना. ढवळीकरांनी लिहिला. प्रतापसिंह महाराजांचे पुराणिक गोपालाचार्य कालगावकरांनी **नीतिमंजरी, राघव चंपू, राधाविलास, रासार्या, विठ्ठलार्या** हे ग्रंथ लिहिले. तसेच **महाभारता**चे मराठी रूपांतर केले. कोरेगावच्या नरहरीदास यांनी **निजानंद मुक्तावली** आणि **अभंगरामायण** या ग्रंथांची रचना केली तर भीमस्वामी शिरगावकरांनी **भक्तलीलामृत** हा ग्रंथ लिहिला. समर्थ संप्रदायातील भीमस्वामी (सन १६४२-१७४१) हे कराडजवळील शहापूरचे. त्यांनी तंजावरला स्थापना केलेल्या मठाची अजूनही परंपरा चालू आहे. भीमस्वामींनी समर्थांचे लघुचरित्र लिहिले. त्याशिवाय त्यांनी अनेक स्फुट पदेही रचली आहेत. वडुथच्या रघुनाथ कवीने केनोपनिषदावर **आत्मबोघ प्रकाशिनी** ही मराठी ओवीबध्द टीका लिहिली. कुरोलीच्या आनंदनाथांनी **भक्ततरंगिणी** हा ग्रंथ लिहिला तर आत्माराम चरेगावकरांनी **संतविजय** व हनुमंतस्वामीच्या बखरीच्या आधारे **समर्थ चरित्र** व काही अभंग लिहिलें. वाईच्या परशुरामपंत तात्या गोडबोलेंनी **नवनीत** (१८५४) हे काव्यसंग्रहात्मक पुस्तक लिहिले. पंडिती पद्धतीची काव्यरचना करणारा सामराज (१६१३-१७००) हा साताऱ्याच्या राजोपाध्ये घराण्यातील व शिवाजी महाराजांच्या दरबारात महत्त्वाचे स्थान भूषविणारा पंडित कवी होता. त्याचे **रुक्मिणीहरण** हे अष्टसर्गात्मक महाकाव्य अध्यात्मबोध, शृंगार व वीररसाने भरलेले आहे. याशिवाय त्यांनी **मुदगलाख्यान** नावाचे काव्यही लिहिले. पंडिती काव्याचे एक प्रमुख वामन पंडितांची **यथार्थदीपिका** ही गीतेवरील टीका प्रसिध्द आहे. तितकीच त्यांची **भागवतावरील** आख्याने व यमकप्रधान श्लोकही प्रसिध्द आहेत. त्यांच्या यमकप्रधान काव्यामुळे त्यांना " यमक्या वामन " असेही म्हणत. विव्दत्व आणि कवित्व यांचा दुर्मिळ संयोग त्यांच्या ठिकाणी झालेला होता. वामन पंडितांची समाधी वाई जवळ कृष्णाकाठी भोगाव [काही विव्दानांच्या मते वामन पंडीतांची समाधी सांगली जिल्ह्यातील शिगाव व कोरेगावच्या जवळ (ता. वाळवा) वारणातीरी आहे--**भारतीय संस्कृतिकोश**, खंड ८, पृष्ठ ५९१.] येथे असून प्रतिवर्षी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उत्सव भरतो.

राजकीय क्षेत्रात राहूनही काव्यरचना करणारा निरंजनमाधव (सन १७०३-१७९०) थोरल्या बाजीरावांच्या पदरी होता. हा पेशव्यांचा वकील म्हणून अनेक ठिकाणी फिरला होता. यास संस्कृत, मराठी व्यतिरिक्त कन्नड, हिंदी, गुजराथी या भाषा येत होत्या. त्यांनी **संप्रदायपरिमळ** [अलीकडील संशोधकांच्या मते हे चरित्र त्यांच्या निरंजनदास नामक शिष्याने लिहिले--**भारतीय संस्कृतिकोश**, खंड ५, पृ. ११३.] सारखे आत्मचरित्र, **समुद्राहरण** हे चंपूकाव्य, **तीर्थयात्रा** हे प्रवासवर्णन, **निर्वोष्ठ राघव** ही पंडिती रचना व **कृष्णानंद सिंधू** वृत्तांवरही ग्रंथ लिहिला. त्या शिवाय त्यांनी **चिदोध रामायण, ज्ञानेश्वर विजय** इत्यादी वैविध्यपूर्ण ग्रंथरचना केली.

अनुक्रमणिका

मोरोपंती परंपरेतील कवी नागेश म. मटंगे (१८०१-१८३३) यांचा **नंदिकेश्वरजननाख्यान** नामक काव्यसंग्रह प्रसिध्द आहे. तर साताऱ्याचेच दत्तभक्त विष्णुदास महाराजांनी (सन १८६४-१९२४) देवदेवतांविषयी अनेक पदे, अभंग, आरत्या, आख्याने रचली. त्यांचा आत्मचरित्रपर पोवाडा फारच सुंदर असून त्यांच्या कविता तीन खंडात प्रसिध्द झाल्या आहेत. पाटणच्या अनंत तथा दादा महाराज किर्लोस्करांनी **दत्तगुरुसेवा, महालक्ष्मीसेवा** इत्यादी ११ गीतसुमने, अभंग व आर्या वृत्तातील **केन, ऐतरेय, मांडुक्य** उपनिषदांचा अनुवाद, **श्रीमद्‌भगवत** गीतेचे मराठीत रूपांतर केले असून प्रसंगानुसार इतर स्फुटकाव्यही लिहिले आहे. सेवाभाव हाच स्थायीभाव असलेल्या श्रीधरस्वामीचे १९३५ ते १९४० या काळात सज्जनगडावर वास्तव्य असताना **मोक्षसंदेश, उज्वलसंदेश, दिव्यसंदेश, भक्तिसार, विवेकोदय, मुमुक्षुधाम, आर्यसंस्कृती** असे अनेक गद्यग्रंथ व **श्रीशिवशतितीलक, श्रीदत्तकरुणार्णव, अभंग रामायण, श्रीरामपाठ, स्वात्मनिरूपण, श्रीसमर्थपाठ** इत्यादी पद्यरचना केली. औंधच्या पंतप्रतिनिधी घराण्याचे मूळ पुरुष परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी विजयदुर्गास बंदिवासात असताना त्यांनी काही काव्य व आरत्या रचल्या. खटावच्या कृष्णराव खटावकरने **विष्णु सहस्त्रनामावर** टीका लिहिली.

वरील संत साहित्याप्रमाणेच नाथपंथी अध्यात्मिक विचारसरणीची शाहिरीही या जिल्ह्यात जोपासली गेली. साताऱ्याजवळील त्रिपुटी येथील नाथपंथी विचारसरणीचे शाहीर साधूपुरुष गोपालनाथाने **गुरुगीता टीका, वेदांत शिरोमणी** यासारखे गुरुमहात्म्य आणि अव्दैत सिध्दांत प्रतिपादन करणारे ग्रंथ लिहिले. तर भक्तिप्रधान भेदिक शाहिरी रचना करणारा कलगी सम्राट हैबती (१८१०-१८८८, डिसकळ, ता. खटाव) याने **रामायण, महाभारत** सारख्या ग्रंथांवर भेदिक काव्यरचना केली. शिवाय **तुर्तबोध आत्मानुभवसार, श्री नाथलिला विलास** हे तत्व विवेचनपर ग्रंथही लिहिले. तुरा सम्राट संभूराजूनेही आपल्या काव्यानी फड गाजविले. हैबतीच्या भेदिक कवन रचनेने प्रभावित होऊन रेठरे हरणाक्षचे बापूराव कृष्णा कुलकर्णी तथा पठ्ठे बापुराव यानीही भेदिक रचना केली व पुढे समाजशिक्षण आणि स्वातंत्र्य चळवळीस पोषक असे वगनाट्य लिहून शाहिरी वाङ्मयातील "वगनाट्य" हा नवीन प्रकार सुरू केला. पठ्ठे बापूरावांनी (नाव-श्रीधर कृ. कुलकर्णी, १८६८-१९४६) **तात्याबापूचा फार्स, शूर शिपायाचा झगडा, सासू जावयाचा झगडा, नोकरीकरिता आलेल्या शूर शिपायाचा वग, गंगाराम व मिठाराणी** इत्यादी वगनाट्ये लिहिली. याशिवाय त्यांनी दोन लाख लावण्या लिहिल्या. हैबतीच्या परंपरेतील शाहीर मारुती झरे (शिंदे) ओझर्डेकर यानींही विपुल शाहिरी केली. संभूराजू यांच्या परंपरेत जखिणवाडीचा (ता. कराड) चिलू सोनार हा शाहिर होऊन गेला. गोपालनाथाच्या परंपरेतील शेख सुलतान यानीही अध्यात्मिक शाहिरी रचना केली आहे. शृंगारिया शाहिर कवी सगनभाऊ सातारा सोडून पुणे येथे स्थिरावला. शाहिरांच्या रचना काहीशा लिखित तर बऱ्याचशा मौखिक स्वरूपात प्रचलित आहेत. फार थोड्या रचना मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत.

वरील विवेचनावरून मध्ययुगीन कालखंडात सातारा जिल्ह्यात संत, पंडिती आणि शाहिरी अशा तीन प्रवाहातील महत्त्वपूर्ण लेखन करणारे कवी आढळतात. तसेच नाथ, महानुभाव, समर्थ या संप्रदायांच्या विचारसरणीने प्रभावित साहित्याचीही निर्मिती झालेली दिसते.

नंतरच्या कालखंडात (१८७४) प्रागतिक स्वरूपाच्या मराठी कवितांची निर्मिती झालेली दिसते. साताऱ्याजवळील माहुली या गावी जन्मलेले म. मो. कुंटे यांनी **राजा शिवाजी** व **मन** ही दोन काव्ये लिहिली. सन १८७१ पर्यंत राजा शिवाजी या महाकाव्याचे सहा भागच प्रसिध्द झाले. या महाकाव्याने आधुनिक वळणाच्या कवितेचा नवा पायंडा घातला. शिवाजीच्या अलौकिक व्यक्तिमत्वाबरोबरच लौकिक

अनुक्रमणिका

घरगुती रूपही या काव्यातून रेखाटले. तसेच तत्कालीन छत्रपती राजारामाच्या मृत्यूविलापाचेही काव्य लिहिले. रामशास्त्री गोडबोले (सन १८३७-१९१३) संस्कृत भाषेत सुंदर काव्य करीत. ते सहज सरस स्तोत्रे रचित. त्यांचा मंत्रशास्त्राचा व्यासंग दांडगा होता. कृष्णाजी नारायण आठल्येंनी **सौभाग्याची पुनर्घटना** व **नाटक्याचा पश्चाताप** ही सामाजिक काव्ये लिहिली. साताऱ्याचे कृष्णाग्रज तथा यशवंत म. गद्रे यांनी ऐतिहासिक, राष्ट्रीय जागृतीपर कविता लिहिल्या. तसेच **तुकाराम स्तोत्र व टिळक महात्म्य** सारखी विभूतीपूजक सरस काव्ये लिहिली. चाफळचे य. दि. पेंढारकर तथा कवी यशवंत यांची **यशोधन** (१९२९), **यशोगंध, पाणपोई, भावमन्थन** (१९३०) आदि काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या कवितेत राष्ट्रप्रेम व सर्वसामान्य माणसाच्या मनोवेदना प्रकर्षाने प्रगट झाल्याचे दिसून येते. त्यांची "आई" ही कविता प्रसिध्द आहे. इ. स. १९२१ मध्ये बडोदा येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात त्यांचा "राजकवी" म्हणून गौरव करण्यात आला होता. सन १९५० मध्ये त्यांनी मुंबई येथे ३३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. त्यांचेच जोडीदार शंकर केशव कानेटकर तथा कवी गिरीश रहिमतपूरचे, गिरिशांचे **सारंगीवाला, मानसभेद, अभागी कमल व आंबराई** ही काव्ये प्रसिध्द आहेत. हे दोघेही रविकिरण मंडळाचे सन्माननीय सदस्य होते. यवतमाळ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिध्द कवी व लेखक ग. दि. माडगूळकर यांचे वास्तव्य काही काळ औंधमध्ये होते. त्यानी पटकथा लेखक आणि गीतकार म्हणून स्वतःचे असे वेगळे युग निर्माण केले. त्यांनी रचलेले **गीतरामायण** अजरामर झाले आहे.

काव्यक्षेत्रात वसंतगडच्या दत्तप्रसन्न कारखानीस यांनी **क्षितिजावर** (१९३५) हा कवितासंग्रह व विडंबनात्मक काव्य **स्वगृहिणी** लिहिले. साताऱ्याच्या त्र्यंबक रामचंद्र अभंग यांच्या राष्ट्रीय गीतांवर (१९३०) ब्रिटीशांचा रोष ओढवला होता. औंधचे कवी बा. भ. दाभाडे तथा शशांक यांची **मरीचिका** व **मालती**, कोरेगावचे विनायक शा. काळे यांचे **आकाशगंगा** व **जलधारा** हे काव्यसंग्रह, वाईचे भय्याशास्त्री वाटवे यांचे **परिपूर्ती** हे सामाजिक खंडकाव्य, पद्यबध्द विनोदी चुटके करणारे पंडितराव सप्रे यांचा **अर्धचंद्र**, नरहरीबुवा फलटणकरांचे **शिवलीलाकलाप**, तर कराडचे बाळकृष्ण घाटे यांचे बजाजी निंबाळकर व हिरकणीवर आधारित **शिववात्सल्य**, गोविंद चि. माटे यांचे **शिवप्रताप** खंडकाव्य आणि साताऱ्याच्या पुरुषोत्तम गोवईकरांचे **प्रतापगड** हे काव्य, बाळासाहेब औंधकरांची **शिवकथाकुसुममाला**, औंधच्या मार्तंड कृष्ण दाभाड्यांचा **आगऱ्याहून सुटका** हा पोवाडा व शिवछत्रपती संबंधीच्या काव्यरचनाही लक्षात घेण्यासारख्या आहेत.

आधुनिक कवींचे कुलगुरू दुसरे केशवसुत म्हणून सुविख्यात असलेले सातारा तालुक्यातील मर्ढे येथील बा. सि. मर्ढेकर (मूळ आडनाव गोसावी) नवकाव्याचे प्रणेते म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे **शिशिरागमन** (१९३९), **काही कविता** (१९४७), **आणखी काही कविता** (१९५१) हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या काव्य लेखनावर बालकवी माधव ज्युलियन यांचा प्रारंभिक ठसा दिसतो. मर्ढे येथे त्यांचे स्मारक उभारण्यात आले आहे. आधुनिक मराठी कवी रेव्ह. नारायण वामन टिळकांचे वास्तव्य काही काळ पाचगणीला होते. त्यांनी वाई ते पाचगणीपर्यन्तच्या प्रदेशाचे वर्णन काव्यातून उभे केले. **वैखरी** हा त्यांचा काव्यसंग्रह. ते फुलामुलांचे कवी म्हणून प्रसिद्ध असून त्यांनी रचलेल्या खंडकाव्यातून त्यांच्या साध्या व प्रेमळ स्वभावाची ओळख पटते. "बाळाचे अश्रू", "केवढे हे क्रौर्य" या कवितांतून हळुवारपणा व कारुण्याचे पदरही उकललेले दिसतात. प्रभाकर बिडवे यांचे **बकुळ फुले** व **आहुती** हे काव्यसंग्रह, प्रा. वसंत बापट यांची **सैनिक गीते, बिजली, सेतू, अकरावी दिशा** हे कवितासंग्रह, साखरवाडीचे माधव व्यं. मंगसुळीलरांची **उधळलेली फुले, वेणुनाद, गीतवाहिनी, माझी मातृभूमी** सारखे लघुखंडकाव्य, चांगदेव भ. खैरमोडे यांचे **अमृतानाद** हे खंडकाव्य प्रसिद्ध आहे. मरळी (पाटण ता.) चे नानासाहेब देशपांडे तथा कवी विहंग हे

उत्कृष्ट पत्रकार, भावकवी आणि संगीताचे जाणकार होते. त्यांची भावगीते (१९५०-१९६०) आकाशवाणीवरून सादर होत. त्यांचा देशभक्तीपर कवितासंग्रह **तेजस्विनी** आणि **ललित संगीत** हा छोटा काव्य संग्रह होय. फलटणच्या वामन मो. कोळेकरांचा **रांगतो अंगणी** हा काव्यसंग्रह, पंत राजकुमारी आक्कासाहेब यांचे **भावलेखा**, फलटणचेच कृष्णचंद्र भोईटे यांचे **अस्मिता**, बबनराव नावडीकरांचे **गीतदासायन**, कराडचे शंकरराव करंबळेकरांची **कवी पुष्कर** रचना लक्ष वेधून घेतात. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्याचा संदेश गावोगावी पोहचविणारे व शहिरी वाङ्.मयातून महाराष्ट्राच्या अस्मितेचे दर्शन घडविणारे पसरणीचे (ता. वाई) शाहिर साबळे तसेच पांडुरंग द. खाडिलकर, बी. डी. कराडकर, अच्युतराव कोल्हटकर, पाचवडचे घनश्याम व. दातार, साताऱ्याचे दामूअण्णा एकबोटे व मारुतराव हळवे, एकसळचे दादा साखळकर, औंधचे बाळकृष्ण रा. जोशी यांनी ऐतहासिक पोवाडे रचले. सातारा जिल्ह्यातील लोकवाङ् मयाच्या अभ्यासक, संशोधक व अनेक लोकगीतांच्या संग्राहक डॉ. सरोजिनी बाबर या लोकसाहित्य समितीची धुरा आजही सांभाळत आहेत.

जिल्ह्यात तुलनात्मकदृष्ट्या सुरुवातीचा पद्यसाहित्याचा प्रभाव कमी होऊन १९ व्या शतकात गद्य साहित्याची निर्मिती झालेली दिसते. यात प्रामुख्याने बखरी, निबंधासारखे वैचारिक वाङ्.मय, संशोधनात्मक वाङ् मय, चरित्र, कादंबरी, लघुकथांचा उल्लेख करता येईल.

सन १८७० पर्यन्त जिल्ह्यात जे गद्य साहित्य निर्माण झाले त्यात बखरकार मल्हार रामराव चिटणीस (बोरगावचे) यांच्या बखरी इतिहास वा साहित्याच्या दृष्टीने मोलाच्या होत. यात त्यांचे सप्तप्रकरणात्मक **शिवचरित्र** उल्लेखनीय आहे. **हनुमंतस्वामीची** बखर ही त्यांनी व चाफळचे रंगो लक्ष्मण मेढे यांनी लिहिली. त्यात शिवाजी व रामदास यांची व्यक्तिवैशिष्ट्ये चांगली वर्णिली आहेत. मल्हारराव हे छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या पदरी चिटणीस म्हणून होते. त्यांनी लिहिलेली **जयरामस्वामींची बखर** उल्लेखनीय आहे. इतिहाससंशोधक, संग्राहक व लेखक दत्तात्र्यय ब. पारसनीसांची *अयोध्यानाथ* (१८९२), **झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाईचे चरित्र** (१८९४), **ब्रह्मेंद्र स्वामी धावडशीकर चारित्र** (१९००) व **बायजाबाई शिंदे चरित्र** (१९०२) ही चरित्रे प्रसिद्ध आहेत. त्यांनी जमवलेला ऐतिहासिक कागदपत्रांचा संग्रह महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात आहे. वाईचे रावजी भवानराव पावगी यांचे **चार्लस् ब्रॅडला** (१८९४) व **ॲनी बेझंट** यांची चरित्रे, ना. वि. बापटांचे **श्रीमंत बाजीराव बल्लाळ उर्फ पहिले बाजीराव पेशवे** यांचे चरित्र, चिं. गं. भानू लिखित **रिचर्ड कॉब्डेन** (१८९०), कराडचे कृष्णाजी आबाजी गुरुजी यांचे **लोकमान्य टिळकांचे चरित्र**, कृ. ना. आठल्येकृत **लोकहितवादींचे चरित्र** व **रामदास चरित्र**, कोपर्डेकर अण्णाजीराव शि. चव्हाणांनी लिहिलेले **रविंद्रनाथ टागोरांचे चरित्र**, सदाशिव खंडो आळतेकरांचे **समर्थ चरित्र** व पु. पा. गोखले यांचे **आगरकर चरित्र** व **सातवळेकर चरित्र** हे दर्जेदार चरित्रग्रंथ आहेत. मनोहर काथवटेंची **खलिफा अबुबकर व उमर चरित्रे**, प्रा. श्री. म. माटे यांचे **प्रेमिकांना आहेर, आपापले हितगुज, बाराशास्त्र, पाच सुधारक, कर्तबगार स्त्रिया, पाश्चात्य पुरुष श्रेष्ठ, अपूर्ण स्त्री-पुरुष** आदि चरित्रात्मक पुस्तके प्रसिद्ध आहेत. कराडचे बाबूराव काळे आणि खटावचे शहा यांनी लिहिलेले **यशवंतराव चव्हाणांचे चरित्र**, अष्टे येथील काशीबाई कानिटकरांचे **डॉ. आनंदीबाई जोशी** व प्रा. वि. पु. गोखले यांचे **बाबा राघवदास चरित्र**, साताऱ्याच्या गो. रा. राजोपाध्ये यांचे **चौंडे महाराजांचे चरित्र**, गोविंद फणसळकरांचे **महादजी शिंदे चरित्र**, रा. गो. भिडे यांचे **नारायण महाराज चरित्र**, द. स. हर्षे यांचे **सावरकर दर्शन** व वि. स. वाळींबे यांचे **सावरकर चरित्र**, स्वामी केवलानंदांचे **अक्कलकोट स्वामी चरित्र**, लक्ष्मणशास्त्री जोशींचे **महात्मा जोतिबा फुले चरित्र**, चांगदेव खैरमोडे यांचे **आंबेडकर चरित्र खंड १ व २**, प्रा. एस. आर. पारसनीसांचे **न्यूटन चरित्र, गोखले चरित्र, रावबहादूर द. ब. पारसनिस चरित्र**, प्रा. वसंत बापटांचे **साने गुरुजींची जीवन**

**साधना**, पु. पां. गोखले यांचे गुरु शिष्यांची ओझरती ओळख करून देणारे **गोखले गाथा**, बॅ. पी. जी पाटीलांचे **कर्मवीरोपनिषद**, डॉ. हे. वि. इनामदारांचे **हरि नारायण आपटे-व्यक्ती आणि वाङ्मय**, संभाजीराव पाटणेंचे **त्यागमूर्ती कर्मवीर भाऊराव, शिक्षण महर्षी बापूजी, माणुसकीचा नंदादीप, संत गाडगेबाबा** आदी चरित्रपर लेखन उल्लेखनीय आहेत. तत्कालीन सातारा जिल्ह्यातील इस्लामपूरचे वासुदेव दा. मुंडले यांनी स्वराज्य व स्वातंत्र्यांची आकांक्षा बाळगणाऱ्या तरुणांना बहुश्रुत, विचारवंत व कार्यक्षम बनविणे व सापेक्ष ज्ञान करून देण्याच्या उद्देशाने परदेशातील **काव्हुर, थॉमसपेन, नेपोलियन, मादाम रोलंव, वुइल्यम धि थायलंड व कार्ल मार्क्स** इत्यादी चरित्रे लिहिली. इतिहाससंशोधक दत्तो वामन पोतदार यांनी अखेरच्या १० वर्षांच्या काळात वाई येथील वास्तव्यात **शिवचरित्रा** वरील काही टिप्पणे लिहिली होती.

रोजनिशी स्वरूपात उपलब्ध असलेले **छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे आत्मचरित्र**, समाजसुधारक सीताराम ग. देवधर यांचे **माझा जीवन वृतांत**, नटवर्य ग. कोल्हटकरांचे **बहुरूपी**, कमलाबाई देशपांडे यांचे **स्मरणसाखळी,** प्रा. श्री. के. क्षीरसागरांचे **तसबीर** आणि **तकदीर** (आत्मचरित्र), औंधचे पंतप्रतिनिधी बाळासाहेब (सन १९३५ मध्ये इंदूर येथील २१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष) यांचे आत्मचरित्र, भार्गव महादेव तथा बाळासाहेब साठे यांचे आत्मनिवेदन, कृ. पा. कुळकर्णी यांचे **कृष्णाकाठची माती,** यशवंतराव चव्हाणांचे **कृष्णाकाठ,** श्री. म. माटे यांचे **चित्रपट** इत्यादी आत्मचरित्रपर पुस्तके विशेष उल्लेखनीय आहेत.

समाजसुधारक व धारदार लेखणी असलेले साताऱ्याचे अग्रगण्य निबंधकार गोपाळ गणेश आगरकर (सन १८५६-१८९५) हे कराड जवळच्या टेंभू गावचे, त्यांच्या जन्मस्थानी त्यांचे स्मारक आहे. ते **केसरी** व **मराठा** वृत्तपत्रांचे संपादक होते. नंतर त्यांनी स्वतःचे स्वतंत्र व सडेतोड विचारसरणीचे **सुधारक** (१८८८) हे वर्तमानपत्र काढले. त्यांच्या मृत्युनंतर ते बंद पडले. **केसरीतील निवडक निबंध, विविध विषय संग्रह, निबंध संग्रह** त्याचप्रमाणे व्याकरण **विषयक वाक्यमिमांसा, डोंगरीच्या तुरुंगातील एकशे एक दिवस, विकार विलसित** हे हॅम्लेटचे रूपांतर ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.

न. चिं. केळकर (सन १८७२-१९४७) हे साताऱ्यात वकिली करीत. लो. टिळकांच्या आदेशावरून ते **केसरीत** गेले व त्यांनी **केसरी-मराठाचे** संपादकपद सांभाळले. त्यांची अष्टपैलू लेखक म्हणून प्रसिद्धी होती. त्यांच्या साहित्यात विषयाचे सांगोपांग ज्ञान, तपशीलवार वर्णनाची हातोटी, प्रमाणशीर व आकर्षक विनोद, प्रसंगानुरूप भाषा, अलंकरण प्रचुरता, कोटीबाजपणा इत्यादी गुण दिसून येतात. त्यांनी लिहिलेले **टिळक चरित्र** प्रमाणभूत असून **केसरीतील निवडक निबंध, सुभाषित व विनोद, हास्यविनोद मिमांसा, मराठे व इंग्रज,** इत्यादी पुस्तके तसेच **तोतयाचे बंड, चंद्रगुप्त, कृष्णार्जून युद्ध, अमात्य माधव, वीर विडंबन, संत भानुदास** ही नाटके लिहिली. सन १९२१ मध्ये बडोदा येथील ११ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष हाते. त्यांचे **समग्र केळकर वाङ्मय** बारा खंडात प्रसिद्ध झाले आहे.

नवजीवनाच्या चळवळीचे नेतृत्व करणारे समाजसुधारक आणि विचारवंत साहित्यिक गोपाळ हरी देशमुख तथा लोकहितवादी (जन्म-पुणे-१८२३, मृत्यु-१८९२) १८५२ मध्ये वाई येथे मुन्सफ म्हणून आले. पुढे साताऱ्यास जज्ज म्हणून होते. वाईची नेटिव्ह जनरल लायब्ररी लोकहितवादींच्या प्रेरणेमुळेच निघाली. समाजप्रबोधनाबाबत महाराष्ट्रात प्रथमच **शतपत्रां**मधून त्यांनी निबंधात्मक लेख लिहिले. समाज प्रबोधनकार व आद्य निबंधकार म्हणून मराठी साहित्याच्या इतिहासात लोकहितवादींचे स्वतंत्र स्थान आहे.

अनुक्रमणिका

ओजस्वी भाषाशैली व आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी त्यांचे निबंध उल्लेखनीय आहेत. **शतपत्रां**शिवाय त्यानी अनेक विषयांचे लेखन केले आहे. इ. स. १८५२ ते १८५५ या काळात वाईत वास्तव्य असताना त्यांनी विपुल लेखन केले.

इतिहासकार द. ब. पारसनिसांनी **पेशव्यांची रोजनिशी**, भाग १ व २, **महेश्वर दरबारची बातमी पत्रे, पेशवे दप्तरातील उताऱ्यांचे** आठ खंड आणि ग्वॉल्हेरदरबार संबंधी कागदपत्रांचे सात खंड संपादित केले. त्यांची **मराठ्यांचे पराक्रम** (१८९५), **अयोध्येचे नबाब** (१८९९), **मराठ्यांचे आरमार** (१९०४) इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक व समतावादी महात्मा जोतिबा फुले (सन १८२७-१८९०) हे कटगूणचे (ता. खटाव), क्रांतिकारी विचारशैलीने त्यांनी समाजात जागृती केली. त्यांची **ब्राह्मणांचे कसब** (पद्यात्मक), **शिवाजीचा पोवाडा, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, जातभेद विवेकसार, शुद्रांची गाऱ्हाणी, इशारा, सत्यधर्म प्रकाश** इत्यादी पुस्तके आहेत. मेणवलीचे नाना फडणवीसांचे वंशज चिंतामण गंगाधर भानू (१८५६-१९२९) यांनी **भरताचे नाट्यशास्त्र, चतुःसूत्री, दहा उपनिषदे, भगवत गीता** यांची भाषांतरे व स्पेन्सर कृत **डाटा ऑफ एथिक्स व जस्टिस** या पुस्तकाचा अनुवाद केला. तसेच नाना फडणवीस व महादजी शिंदे यावरील **केसरीतील** लेख पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. **मराठ्यांचा इतिहास** (History of Marathas) प्रथम इंग्रजीत ग्रंथबद्ध करणारा ग्रँट डफ याने आपल्या साताऱ्याच्या वास्तव्यात या ग्रंथाचे बरेचसे काम केले. प्रतापसिंह महाराजांच्या कारकिर्दीत माधवराव मुन्शीनी **समारंजनी** हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात अद्भूतता व इतिहास यांची सांगड घातली आहे. बावधनच्या विष्णु पंडितांनी **हिंदुस्थानचा इतिहास, विधवा विवाह, इंग्रजी-मराठी कोश** व **पुष्पमाला** हे ग्रंथ लिहिले. कृष्णाशास्त्री गोडबोलेनी **मराठी व्याकरण** रचले तर कोषकार रघुनाथ भास्कर गोडबोले (वाईचे) यांचे **मराठी भाषेचा नवीन कोश, भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश, भारतवर्षीय अर्वाचीन चरित्र कोश** प्रसिद्ध आहेत. वाईचे महादेवशास्त्री गोविंद कोल्हटकर (१८२२-१८६५) हे प्रभावी वक्ते व ग्रंथकार होऊन गेले. त्यांनी शेक्सपिअरच्या **ऑथेल्लोचे** मराठी भाषांतर केले. इंग्रजी नाटकाचा मराठीतील हा पहिलाच अनुवाद. तसेच त्यांनी **कोलंबसचा वृत्तांत** (अनुवाद) (१८४९), **पदार्थ विज्ञान शास्त्र** (१८६१) व **प्राकृत कवितेचे पहिले पुस्तक** सारख्या शालोपयोगी पुस्तकांची व कवितांची मराठी भाषांतरे केली. वाईचे संस्कृत भाषेचे व्यासंगी आबाजी विष्णु काथवटे यांच्या नावावर **कीर्ति-कौमुदी, दयाश्रम कोश, अथर्ववेद-उत्तर भाग** हे ग्रंथ आहेत. मद्रासकडील घराणे परंतु पिढ्यान-पिढ्या महाराष्ट्रात स्थायिक असलेल्या रंगाचार्य रेड्डींनी **मृच्छकटीक, मालविकाग्नि मित्र, काव्यदर्श** या संस्कृत ग्रंथांवर विस्तृत टीका लिहिली, तसेच **न्यायसार, कुंदमाला, ब्रह्मसूत्राचे माधव भाष्य** यांची भाषांतरेही केली. सातारा येथे जन्मलेले वासुदेव बळवंत पटवर्धन (१८७०-१९२१) यांची **काव्य आणि काव्योदय, तुकाराम महाराजांच्या अभंगाची चर्चा** ही पुस्तके उल्लेखनीय आहेत. जगद्गुरू शंकराचार्यांच्या **उपरोक्षीनुभूती** (१८६६) या ५८६ ओव्यांच्या ग्रंथाचा श्रीकृष्ण कदम यांनी मराठीत अनुवाद केला. कदमांचे गुरू शहाजी प्रतापसिंह (सातारा) तथा जंगली महाराज यांचे **ब्रह्मस्मृति व ब्रह्मधर्म** हे ग्रंथ, कराडचे मा. ना. कोपर्डे यांचा **पंचामृत** (१९२७), वाईच्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या अनेक पुस्तकांपैकी **आनंद मीमांसा व जडवाद, जोति निबंध, वैदिक संस्कृतीचा विकास, मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत, हिंदूधर्माची समीक्षा व धर्मविधी** हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. माहुलीच्या वि. ना. कुंभारे यांचे **बुद्धिप्रामाण्य** (१९१४), साताऱ्याच्या विष्णु कुलकर्ण्यांचा **पॅथेगोरस स्मृती** (१९४१), कराडचे भा. ना. विपटांचा **मृत्यूलोकचा प्रवास** (१९४४), ना. ह. आपटे यांचे **आपण आहो माणसे** (१९४५), साताऱ्याच्या गो. ह. महाजनकृत **प्राचीन भारताच्या सांस्कृतिक इतिहासाची रूपरेषा**, वाईच्या मनोहर वि. काथवटे यांचा **सुधारणा, उद्भव व उपाय** (१९३३), **भारत खंडाचा प्राचिन इतिहास, पारशी समाजाचा इतिहास**, महादेव शास्त्री दिवेकरांचा **आर्य संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष** (१९२९) व धर्मसुधारणेवरील

**ब्राह्मणातील पोटजातींचे उच्चाटन, ब्रह्मज्ञान व बुवाबाजी**, पाचवडचे श्रोताचार्य धुंडीराज यांची **आर्य संस्कृती** (१९३४) व **ऐतरेय ब्राह्मण** चे मराठी भाषांतरे, साताऱ्याच्या महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री अभ्यंकरांची (१८६३-१९४२) **काव्य प्रदीपोद्यान** (१९११), **योगभाष्य** (१९१७), **काव्यप्रकाश संकेत** (१९२१), **न्यायकोश** (१९२८) इत्यादी संशोधनपर ग्रंथ तसेच **श्रीभाष्यटीका** (१९०४), **यतीन्द्रमतदीपिका प्रकाश** (१९०५), **श्री भाष्य निवृत्ती** (१९१६), **सर्वदर्शन संग्रह** (१९२४) इत्यादी टीकात्मक ग्रंथ व **वैदिक संसार व मराठी ब्रह्मसूत्र शंकरभाष्य** प्रसिद्ध आहेत. **अद्वैतामोद** ही त्यांची स्वतंत्र ग्रंथरचना होय. मूळचे साताऱ्याचे राहणारे ज्योतिषशास्त्रज्ञ गो. स. आपटे (१८७०-१९३६) यांचे **ज्योतिर्गणितवार्तिक** व **सर्वानंद करणकम** हे संस्कृत व मराठी ग्रंथ, वाईच्या संस्कृत विद्याव्यासंगी काशिनाथ वामन तथा भाऊशास्त्री लेलेंचे (१८६३-१९१८) **महाभारत** व **रामायणाचे** मराठी भाषांतर व लो. टिळकांच्या **गीतारहस्यावर टीका**, चौंडे महाराज यांचे **वैदिक धेनू गाथा, गोज्ञान कोश** आणि **आत्मचरित्र** हे ग्रंथ, वाईच्या भाऊशास्त्री अष्टपुत्रे यांचे **गायन प्रकाश**, बाळासाहेब पंत प्रतिनिधींचे **कीर्तन सुमनहार, चित्र रामायण** आणि **सूर्यनमस्कार**, साताऱ्याच्या डॉ. आठल्यांचे **जगात शांती युग कसे निर्माण होईल**, गो. रा. राजोपाध्येंचे **भारतीय समाजशास्त्र अथवा धर्मप्रणाली**, फलटणच्या प्र. ना. दीक्षितांचा **मराठी व्याकरण व काही समस्या**, प्रा. द. ता. भोसले यांचे **खंडकाव्य, आजची ग्रामीण कथा, नवकाव्यातील दुर्बोधता, ऐतिहासिक कादंबरी, सौंदर्यकुंज व निबंध सरिता**, फलटणचे वामन मो. कोळेकर तथा कवी मयूर यांचा खगोल विषयक **सूर्यप्रभा**, गो. रा. माटे यांचे **असा घडला सातारा जिल्हा**, पु. पां. गोखलेंचे **जागृत सातारा**, प्रा. श्री. के. क्षीरसागरांचे **टीका विवेक, वादसंवाद, उमरखय्यामची फिर्याद, सुवर्णतुला** (समीक्षा), वासुदेव बळवंत पटवर्धनांचे **काव्य आणि काव्योदय, सारेच विलक्षण, तुकाराम महाराजांच्या अभंगाची चर्चा** ही पुस्तके उल्लेखनीय होत. इतिहासतज्ञ ग. ह. खरे यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली असून त्यांची **मूर्ती विज्ञान, महाराष्ट्राची चार दैवते, संशोधकाचा मित्र** ही पुस्तके गाजलेली आहेत.

जिल्ह्यात मर्ढे गावी जन्मलेले म. शि. गोळे हे आगरकरानंतर फर्ग्युसनचे प्राचार्य होते. त्यांनी **ब्राह्मण आणि त्यांची विद्या** व **हिंदू धर्म आणि सुधारणा** हे दोन प्रबंध लिहिले. औंधचे **पुरुषार्थ** मासिकाचे संपादक पंडित श्री. दा. सातवळेकरांनी "अत्रीऋषींचा कारावास", "लक्ष्मीचा एकच प्रश्न", "वामनावताराचा संदेश" इत्यादी अध्यात्मप्रवण व बोधप्रद निबंध लेखन केले. शि. गो. भावे यांचा **सातारा जिल्ह्यातील शेतसारा वाढीचा अन्याय (१९३८)** हा निबंध संग्रह वाचनीय आहे. पंडितराव सप्रे यांचे **सैतानाच्या साम्राज्यात** आणि **चर्पट पंजरी** हे निबंध संग्रह उल्लेखनीय आहेत. तर श्री. म. माटे यांचे **साहित्य धारा, कोवळे निबंध, विचार शलाका** हे निबंध तसेच नवसमाज रचनेच्या दृष्टीने **अस्पृश्यांचा प्रश्न, परशुराम चरित्र** अथवा **पंचमानव** व **हिंदू समाज, विज्ञान बोधाची प्रस्तावना, रसवंतीची जन्मकथा, रामदास स्वामींचे प्रपंच विज्ञान** ही प्रबंधात्मक साहित्य संपदा उल्लेखनीय आहे. श्री. म. माटे यांनी १९४३ मध्ये सांगली येथिल २८ व्या अखिल भारतीय महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषविले होते. या व्यतिरिक्त रंगाचार्य बाळकृष्णाचार्य रेड्डी यांचा **भास की आभास**, गणपतराव आळतेकरांचे **दासबोध समर्थांचाच** व **लोकमान्यांची धार्मिक मते**, बाळकृष्ण वा. धोपटे यांचा विवेकानंदावरील निबंध, लक्ष्मण हरोलीकरांचे तत्वज्ञान विषयक, ना. बा. कार्वेकरांचे कायदे विषयक, लक्ष्मण देशपांडे यांचा **शेती नि शेतकरी हितसंबंध**, यशवंतराव चव्हाणांचा यशोलोचनात्मक आणि पु. पां. गोखले यांचे आगरकर संबंधी निबंध, दत्तात्रय पाठकांचे कालिदासावरील निबंध प्रसिद्ध आहेत. सन १९५९ मध्ये मिरज येथील ४१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीकृष्ण के. क्षीरसागरांचे टीका परीक्षणात्मक निबंध, गोविंद ज. फणसळकरांचे शिक्षण विषयक आणि पुस्तक परीक्षणात्मक निबंध, रा. पा. वैशंपायन यांचे समाज व राजकारण विषयक निबंधांचा उल्लेख करता येईल.

कराडचे श्रीनिवास कुळकर्णी यांचे " डोह", "सोन्याचे पिंपळ", य. दि. पेंढारकरांचे "कांतिणीचे घर" हे लघुनिबंध, दत्तात्रय गो. दीक्षितांचा "मुक्तेश्वराचे महाभारत" हे टीकात्मक निबंध उल्लेखनीय आहेत.

मराठी व गुजराथी भाषेत सफाईदार लेखन करणारे गांधीवादी कार्यकर्ते व साहित्यिक आचार्य काकासाहेब कालेलकर (१८८५-१९८३) यांचा जन्म साताऱ्याचा. बहुभाषा कोविद, रसिक आणि सखोल चिंतक म्हणून त्यांना सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे. सन १९२८ मध्ये त्यांनी गुजरात विद्यापीठाचे कुलगुरूपद व १९५९ मध्ये गुजरात साहित्य परिषदेच्या अहमदाबाद अधिवेशनाचे अध्यक्षपद भुषविले. त्यांची **हिमालयाची हाक** हे प्रवासवर्णन आणि **रविंद्र चिंतन** हे वैचारिक समीक्षात्मक पुस्तक अभिजात ठरले. साबरमतीस गांधीजींच्या आश्रमात असताना ते गुजराथी शिकले. पुढे त्या भाषेवर इतके प्रभुत्व प्राप्त केले की, गुजराथी भाषेतील पहिला **शब्दकोश** (१९२९) त्यांनी लिहिला. त्यांनी लिहिलेली भारतभर व जगभर केलेल्या प्रवासाची वर्णने रोचक व उद्‌बोधक आहेत. गुजराथी साहित्यापैकी बरेचसे साहित्य अनुवादरूपाने मराठीत आले आहे. मराठीत त्यांनी **हिंडलग्याचा प्रसाद** (१९३४), **वनशोभा** (१९४४), **खेळकर पाने** (१९६४) यांसारखी फार थोडी पुस्तके लिहिली आहेत. सन १९६४ मध्ये त्यांना पद्मविभूषण किताब बहाल करण्यात आला. तर १९६६ मध्ये **जीवनव्यवस्था** निबंध संग्रहास साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. वाईच्या लक्ष्मणशास्त्री मोरेश्वर हळब्यांची **मुक्तमाला** [कादंबरीत रागदारी पदांप्रमाणे हावभावांच्या सूचनांसहित संवाद लिहिण्याची प्रथा **मुक्तामाला** पासूनच सुरू झालेली होती. प्रा. रा. श्री. जोग, संपा. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ५ वा, भाग-१ पृ. ४२९.] (१८६१) ही अद्‌भूतरम्य कादंबरी मराठीतील आद्य कादंबरी समजली जाते. त्यांनी **रत्नप्रभा, सुलोचना** व **विचित्रपुरी** या कादंबऱ्याही लिहिल्या. समडोळी गावी जन्मलेले नारायण हरी आपटे (११ जुलै १८८९-१५ नोव्हेंबर १९७१) यांचे सामाजिक व ऐतिहासिक कादंबरी लेखनात मानाचे स्थान आहे. त्यांच्या **अजिंक्यतारा, राजपुतांचा भिष्म, लांच्छित चंद्रमा, मानव आशाविरूद्ध दैवी इच्छा, सुखाचा मूलमंत्र, गृहसौख्य, उमज पडेल तर** आदि कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्या **न पटणारी गोष्ट** या कथानकावर **कुंकू** चित्रपट निघाला. सुरलीच्या नारायण वि. कुलकर्णी यांची **मजूर, शिपाई, पैसा व दिवस कसे जातील**, साताऱ्याचे विठ्ठल वा. हडपांची **झाकली मूठ, बहकलेली तरूणी, विभावरी व गौरीशंकर**, मसूरच्या भाऊ श्रीधर कुलकर्ण्यांच्या **आनंदमठ, कुलांगना कि वारांगना, मूर्तिभंजक व काळा पहाड**, बा. सि. मर्ढेकरांच्या **रात्रीचा दिवस, तांबडी माती** आणि **पाणी** या कादंबऱ्या उल्लेखनीय होत. वाईचे शिवराम गोविंद भावे यांची **मधुराणी**, नागेश विनायक बापट यांची **पानिपतची मोहीम**, कराडचे जगन्नाथ वा. हर्षे यांची **चंद्रोदय**, जयवंत गुजरांची **शमीवरील शस्त्रे**, औंधचे यज्ञेश्वर पां. मेहेंदळे यांची **राणीचा रत्नहार, राजसत्तेवर हल्ला, नराधम आणि मर्दानी सौंदर्य, औट घटकेचे राज्य** या कादंबऱ्या होत. साताऱ्याचे श्रीधर गो. देशपांडे यांची **सहारा, सायंतारा**, निगडीच्या भास्कर ना. विपटांचा **म्हैसूरचा सिंह**, साताऱ्याचे पंढरीनाथ वा. घाणेकरांची **वाघिणीचे दूध**, वा. वि. आठल्ये यांची **कर्मयोगिनी** व पाटणचे रामतनय यांची **खरा उद्धार व मोहित्यांची मंजुळा**, उंब्रजचे दा. न. शिखरे यांची **थोरली आई**, त्याचप्रमाणे वाईच्या नरहर ना. पटवर्धनांची **जीवितयात्रा, इलासुंदरी** या प्रदीर्घ सामाजिक कादंबऱ्या प्रबोधक आहेत. साताऱ्याच्या वि. ह. पिटके यांची **शिदोरी आणि क्रांतिकाल**, कोरेगावच्या शांतिलाल भंडारी यांच्या **आग नि पाणी, पूर्व आणि पश्चिम, संघर्ष, शिशिर, जमीन आस्मान, शिल्पा** या कादंबऱ्या, साताऱ्याच्या द. ता. भोसले यांच्या **मी आणि माझा बाप** व **इथे फुलांना मरण जन्मता**, श्री. म. माटे यांची **पश्चिमेचा वारा** या विनोदी कादंबऱ्या आहेत. रजनी शेठ यांची **ऋणानुबंधाच्या चुकुनि पडल्या गाठी**, सदाशिव अनंत शुक्लांच्या **कमलेची कहाणी, देवाच्या दुनियेत, जानकुर्बान** आणि अनुवादित **देव जागा आहे**, प्रभाकर भ. बिडवे यांची **श्यामला**, गारवड्याचे न. म. जोशी यांची **प्रेषित** आणि **निःस्पृह**, त्याचप्रमाणे प्रभाकर रुईकरांची **बचेंगे तो और भी**

**लढेंगे** या कादंबऱ्या अलिकडच्या काळात मान्यता पावल्या आहेत. पद्माकर गोवईकरांच्या **मुंगी उडाली आकाशी, वणवा, सांगू नये ते, भिरभिरे, वय वेडं असतं** आणि **बहरलेल्या हिवाळ्यात** या कादंबऱ्या आहेत. त्यांनी **मुंगी उडाली आकाशी** या कादंबरी वाचनाचे साभिनय हजारो प्रयोग केले. रविंद्र भट हे चरित्र कादंबरीकार असून त्यांची संत ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील **इंद्रायणी काठी** ही कादंबरी लोकप्रिय झाली असून **भेदिले सूर्यमंडळा** आणि **सत्यं शिवम सुंदरम** या कादंबऱ्यांतून संत रामदास आणि स्वामी विवेकानंद यांचे जीवन आणि तत्वज्ञान प्रभावीपणे मांडले आहे.

कथालेखांमध्ये ग्रामीण कथालेखक प्रा. श्री. म. माटे यांचे **उपेक्षितांचे अंतरंग** (१९४१), **अनामिका, माणुसकीचा गहिवर, भावनांचे पाझर, भावनांची मांडवी, दोन दुर्दैवी नायक, मधूला सांगितलेल्या गोष्टी, भावकथा** इत्यादी कथासंग्रह आहेत. सातारा परिसरातील अनेक स्थळांचा वापर त्यांनी आपल्या कथेच्या पार्श्वभूमीसाठी केला. दलित वर्गाचे प्रभावी व जिवंत चित्रण करणारे माटे हे पहिलेच लेखक होत. ते ग्रामीण समाजसुधारक म्हणून प्रसिध्दीस आले. साताऱ्याच्या वाग्भट ना. देशपांडे यांनी **सुखस्वप्नातून** सुशिक्षित स्त्रियांची कर्तबगारी रंगविली आहे. विनोद तत्परता आणि रचनाकुशलता ही गोविंदराव माटे यांच्या कथेची वैशिष्ट्ये आहेत. त्यांची **गळलेली पाने** हा लघुकथा संग्रह १९३२ मध्ये प्रसिध्द झाला. न. चिं. केळकरांच्या **कथा पंचविशी**मध्ये समर्पक मार्मिकता आहे. पाचवडचे वैद्य घनश्याम दातारकृत **राष्ट्रीय मंगळागौर**, धेनुदास डोळे यांचा धेनुकथासंग्रह, अण्णाजी शिं. चव्हाणांचा **तेजस्वी तारा- रविंद्रनाथ टागोर**, वि. वा. हडपांचे **मोपासाच्या आणि इतर गोष्टी**, श्री. के. क्षीरसागरांचा **राक्षसविवाह**, शरदचंद्र चिरमुले यांचे **श्रीशिल्लक व कॉग्ज** हे कथासंग्रह, सदाशिव अनंत शुक्लांच्या **भरारी, कागदी बदाम, आठवा सर्ग, मंगला** (बालकथा), **गोरा कुंभार, भक्तीचा मळा,** तर पु. ना. परळे यांचे **उसवता हृदय हे, साखळी, रेडसिग्नल** आणि **हवाई उचल्या** मधील रहस्यकथा लक्ष वेधून घेतात. कोरेगावच्या शांतिलाल भंडारी यांच्या **तोंडचा घास, पिंजरा, पाखरं, यशवंत हो यशवंत हो, बहर, वरात, संगत, भव्यदिव्य,** व. बा. मोघे यांच्या **मूर्ती, चकार, उपाय, गराडा,** माधव नावडीकरांचे **तेची पुरुष भाग्याचे** या कथा प्रसिध्द आहेत. पद्माकर गोवईकरांचे **गोफ, नायगारा, अव्देष्टा सर्वभूतानाम** आणि **पोपटपंची** हे विनोदी कथासंग्रह, जयवंत गुजराची **विनोदी कथाची सूर्यफुले**, शरदचंद्र वाळिंबे यांच्या **माफिया किंग, एकलव्य, शकुनीचा फासा, धनुर्धारी, शकुनी** या कथा व रहस्यकथा मनोवेधक आहेत. वाईच्या एस. डी. इनामदार यांच्या **रंगसावल्या** या कथासंग्रहास पु. भा. भावे पुरस्कार मिळाला असून **अरण्यरुदन** हा आणखी कथासंग्रह प्रसिध्द झाला आहे, तर रघुनाथ कुलकर्णी यांचे **सॉलिटरी क्रीपर्स** व **ऐलतीर पैलतीर** हे कथासंग्रह प्रसिध्द झाले असून **हिरण्यगर्भ** कथेला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार मिळाला आहे.

उपरोक्त साहित्याशिवाय जिल्ह्यात कृ. पां. कुलकर्णी यांचा मराठी भाषा आणि व्याकरणावर **मराठी भाषेचा विकास** हा वा. गो. परांजपे यांच्या **झुलब्लोक** ग्रंथाचा भाषांतरित ग्रंथ, विष्णु रा. वेलणकरांचे **जपान**च्या प्रवासाची शिदोरी, जगात कसे वागावे आणि वृध्दांची स्वास्थ्य साधना हे ग्रंथ लक्ष वेधून घेतात. कादंबऱ्या, पुस्तके, नाटक, कविता, अनुबोधपर चित्रपट इत्यादी विविध विषयांवर विपुल लेखन करणारे रविंद्र भट यांच्या **ते माझे घर** या चित्रपटास राष्ट्रपती पारितोषिक (१९६३) व **भेदिले सूर्य मंडळास** चेतना पारितोषिक मिळाले आहे. त्यांची "रामाची भूपाळी" व "श्रमिक हो घ्या इथे विश्रांती" ही काव्ये प्रसिध्द आहेत. त्यांचा **चंद्रफुलांची गाणी** हा निवडक कवितांचा संग्रह असून " घरात हसरे तारे असता " व " प्रतिमा उरी धरोनी " ही गीते प्रसिध्द आहेत. साताऱ्याचे शंकर सारडा यांनी बालवाङ्मय, अनुवाद व विपुल समीक्षण केले आहे. सन १९६१ मध्ये त्यांना महाराष्ट्र शासनाचा बाल वाङ्मयविषयक पुरस्कार, १९८० मध्ये उत्कृष्ट अग्रलेखाचा डहाणुकर पुरस्कार, उत्कृष्ट मुद्रणाबाबत महाराष्ट्र राज्य पुरस्कार व नीमन फेलो

अनुक्रमणिका

हार्वर्ड युनिव्हर्सिटी (अमेरिका), बालकुमार साहित्य संमेलनाचा बाल साहित्य समीक्षा पुरस्कार (१९९३) मिळाला. त्यांचे **चतुरचंपा** (१९५०), **मधुमुरली, राणीपरीच्या कृपा** वगैरे बालवाङ्मय व **काही पुस्तके काही लेखक** (१९६६), **गुलमोहर** (१९७७), **स्त्रीवादी कादंबऱ्या** (१९९३), **ग्रंथ विशेष** (१९९१), **ग्रंथ वैभव** (१९९२), **ग्रंथ चैतन्य** (१९९३) व **ग्रंथ संवत्सर** (१९९५) इत्यादी समीक्षात्मक लेखन आणि **केनेडी** (१९६७), **गृहसौख्य** (१९९१), **जागरी** (१९७९) वगैरे अनुवादात्मक पुस्तके प्रसिध्द आहेत. साताऱ्याच्या डॉ. उमेशचंद्र ज. तावडे यांच्या **निरोगी कान-एक वरदान** या पुस्तकाला अखिल भारतीय नाक, कान व घसा शल्यविशारद संघटनेचा पुरस्कार व धन्वंतरी पुरस्कार मिळाला. लक्ष्मण माने यांच्या **उपरा** ला साहित्य अकादमीचा मराठी भाषेतील पुरस्कार व आंतरराष्ट्रीय ख्यातीचा फोर्ड फौंडेशनचा पुरस्कार मिळाला. वासंती मुझुमदार यांच्या **सहेला रे** या कविता संग्रहाला केशवसुत पुरस्कार, बा. सि. मर्ढेकर व तात्यासाहेब सरवटे पुरस्कार मिळाला.साताऱ्याच्या व्दारकानाथ पां. लेले यांच्या **गाजलेली सात पलायने** या पुस्तकाला राज्य साहित्य पुरस्कार मिळाला. अरुण रा. गोडबोले यांच्या **सहा चित्रपटांची निर्मिती कशासाठी? प्रेमासाठी** या कथेस शासनाचा उत्कृष्ट कथेचा पुरस्कार व **नशीबवान** चित्रपटाला सहा पुरस्कार मिळाले. वाईच्या सु. र. देशपांडे यांच्या **भारतीय कामशिल्प** पुस्तकास महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले. समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांचे **साहित्य आणि सामाजिक संदर्भ** आणि **आनंदाचा डोह** या दोन ग्रंथास उत्कृष्ट समीक्षाग्रंथ म्हणून राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले तर **वाङ्मयीन आकलन** व **निळी पहाट**ला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पुरस्कार मिळाले. या व्यतिरिक्त त्यांचे **नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये, वाङ्मयीन निबंध-स्वरूप व साधने, निळी क्षितिजे, सांस्कृतिक शल्यवेध** इत्यादी साहित्य प्रसिध्द आहे. स्वातंत्र्य संग्रामातील साताऱ्याच्या क्रांतिकारकांचे दर्शन घडविणारे आबासाहेब शिंदे **मुक्तीगाथा महामानवाची** साकार करणारे शिवाजीराव भोसले, संत व प्राचीन वाङ्मयाचे अभ्यासक डॉ. वसंत स. जोशी यांचा उल्लेख अपरिहार्य आहे.

जिल्ह्यात प्रसिध्द होणारी वृत्तपत्रे, नियतकालिकांतूनही धार्मिक, राजकीय व सामाजिक विषयांवर टीकात्मक लेख व निबंध प्रकाशित होत. त्यातील काहींचा थोडक्यात उल्लेख अपरिहार्य आहे. रामचंद्र अप्पाजी चितळे यांच्या **शुभसूचक** (सातारा १८५८) साप्ताहिकात इंग्रज सरकारवर टीका असे. सन १८६७-६८ मध्ये गणेश ना. कोल्हटकरांचे (सुप्रसिध्द नट चिंतामणराव कोल्हटकरांचे वडील) राष्ट्रीय वृत्तीचे **महाराष्ट्र मित्र** या पत्रात मार्मिक लेख लिहिण्यात कोल्हटकरांचा हातखंडा होता. वाईच्या **मोदवृत्तीचे** (१८९०) संपादक भाऊशास्त्री लेले यांच्यावर त्यांच्या लेखांमुळे ब्रिटिश शासनाने राजद्रोहाचा खटला भरला होता. सन १८९९ मध्ये **प्रेक्षक** पत्रात चिरमुले, द्रवीड, फणसळकर, ठाकूर, केळकर, देशपांडे आदि विचारवंत लेख लिहीत. भाऊसाहेब सोमणांचे **राष्ट्रवादी** (१९०६) हे जहाल पत्र होते. इस्लामपूरचे (आता सांगली जिल्ह्यातील) **प्रतोद** हे बाणेदार पत्र होते. साताऱ्याचे इतिहास संशोधक दत्तोपंत पारसनिसांची **महाराष्ट्र कोकीळ** (१८८७) व **भारतवर्ष** (१८९७) ही पत्रे होती. वाईच्या अच्युत बळवंत कोल्हटकरांनी १९१५ मध्ये **संदेश** या साप्ताहिकात विनोद व वक्रोक्तीपूर्ण लेख लिहिले. त्यांनी १९३१ मध्ये **देशसेवक** हे जहाल राष्ट्रवादी पत्र काढले. याशिवाय **संजय, चाबूक, चाबूकस्वार** ही पत्रेही काढली. **श्रुतीबोध** मासिकातून अच्युतराव कोल्हटकरांनी अध्यात्मिक ग्रंथांची भाषांतरे व टीका प्रसिद्ध केल्या. तसेच त्यांनी यशवंतराव चव्हाणांची व्याख्याने **सह्याद्रीचे वारे** मधून प्रसिद्ध केली.

जिल्ह्यात साहित्याची सेवा करणारी काही नियतकालिके आणि साहित्य मंडळे होती व आहेत. पूर्वीच्या औंध संस्थानातील किर्लोस्करवाडी येथील किर्लोस्कर समुहाची **किर्लोस्कर, स्त्री** व **मनोहर** ही मासिके महाराष्ट्रात प्रसिध्द होती.

फलटणचे कवि मंडळ, औंधचे साहित्य सरोज मंडळ, कराडचे साहित्य सेवा मंडळ आणि महाराष्ट्र वाङ्मय मंडळ, सातार्‍याचे अजिंक्यतारा मंडळ यासारख्या मंडळांनी साहित्याच्या क्षेत्रात भरीव कार्य केले आहे.

जिल्ह्यात वाईची प्राज्ञ पाठशाळा, मराठी विश्वकोश व वसंत व्याख्यानमालेने साहित्याच्या क्षेत्रात मौलिक कार्य केले आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी संस्कृतच्या अध्ययनासाठी स्थापन करण्यात आलेल्या "प्राज्ञ मठाचे" १९०४ मध्ये प्राज्ञ पाठशाळा असे नामांतर करण्यात येऊन पंडित नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांनी २ जून १९९२ रोजी प्राज्ञ पाठशाळा मंडळ ही अधिकृत संस्था स्थापन केली. धर्मकोशाची रचना, भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञान या विषयाचे तत्त्वज्ञान आणि वैचारिक साहित्याचे प्रकाशन ही संस्थेची उद्दिष्ट्ये आहेत. स्वत: स्वामी केवलानंदानी " मिमांसा" या विषयाचा ज्ञानकोश तयार केला. तसेच **कौषीतकीब्राह्मणारण्यक कोष व अव्दैतसिध्दीचा** मराठी अनुवाद केला. सन १९८८-८९ पर्यन्त संस्थेने धर्मकोशाचे **व्यवहारकाण्डम**-भाग १ ते ३, **उपनिषत्काण्डम**-भाग १ ते ४, **संस्कारकाण्डम** भाग १ ते ६, **राजनितिकाण्डम** भाग १ ते ६ व **वर्णाश्रमधर्मकाण्डम**-भाग १ प्रसिध्द केला. तसेच ८०० पृष्ठांचा सातखंडात्मक **मीमांसा कोश** प्रसिध्द केला. **धर्मकोशाचे** मुख्य संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. तसेच धुंडीराजशास्त्री बापट, नरहरशास्त्री तळेकर, व्यंकटेशशास्त्री वळे व इतर शास्त्री मंडळीनी संशोधन कार्य केले.

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाने सुरू केलेली **विश्वकोशाची** निर्मिती हा उपक्रम १९८० पासून विश्वकोश निर्मिती मंडळ राबवित आहे. सन १९९७ पर्यंत **विश्वकोशाचे** १५ खंड प्रकाशित झाले आहेत. **विश्वकोशाचे** पहिले १७ खंड संहिता खंड असून १८, १९, २० हे खंड अनुक्रमे परिभाषा संग्रह, नकाशा खंड (मानचित्र संग्रह) व सूची खंड होत. इंग्रजी-मराठी परिभाषिक संज्ञाचा खंड १९७३ मध्ये प्रकाशित झाला आहे. विश्वकोश मंडळाचे अद्ययावत ग्रंथालय असून त्यात ३७,००० हून अधिक मौलिक संदर्भ ग्रंथ आहेत. खास कोशमुद्रणासाठी स्वतंत्र शासकीच मुद्रणालय आहे. **विश्वकोशाचे** संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्माने धुळे जिल्ह्याचे असले तरी वयाच्या १४ व्या वर्षापासून वाईकर झाले. केवलानंद सरस्वतींच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय, वेदांत, मीमांसा इत्यादी शाखांचे पारंपरिक ज्ञान संपादन केले. कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत विद्यालयातून त्यांनी " तर्कतीर्थ " ही पदवी विशेष प्राविण्यासह संपादन केली. संस्कृत प्रमाणेच पाश्चात्य व इंग्रजी भाषेचा गाढा अभ्यास केला. तसेच धर्म, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी विषयांचा सखोल अभ्यास केला. **धर्मकोशाचे** संपादक, प्राज्ञपाठशाळेचे अध्यक्ष, **विश्वकोशाचे** संपादक, **नवभारत** मासिकाचे संचालक पद इत्यादी जबाबदार्‍या त्यांनी कार्यकुशलतेने पार पाडल्या. रशिया, युरोप, अमेरिका, जपान, फ्रान्स, ब्रम्हदेश इत्यादी देशांत धर्मप्रतिनिधी म्हणून उपस्थित राहून निबंध वाचले. गोमांतक साहित्य संमेलन तसेच मुंबई, इंदूर, बडोदा व दिल्ली (१९५४) साहित्य संमेलनांची अध्यक्षपदे भूषविली. भारताच्या राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर त्यांनी केले. सन १९७२ मध्ये भारत सरकारने " पद्मविभूषण " हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. त्यांचे **शुध्द सर्वस्वम** (१९३४-संस्कृत), **आनंद मिमांसा** (१९२८ तत्त्वज्ञान), **हिंदू धर्माची समीक्षा** (१९४१), **जडवाद अर्थात अनिश्वरवाद** (१९४१), **जोतिनिबंध** (१९४७), **वैदिक संस्कृतिचा विकास** (१९५१), **आधुनिक मराठी साहित्याची समिक्षा आणि रससिध्दांत** (१९७२), **शीख धर्माचा इतिहास** (१९८५) इत्यादी वाड्.मय प्रसिध्द आहे. तसेच त्यांनी संपादित केलेले **धर्मकोश** (११ खंड), **राजवाडे लेख संग्रह** (१९५८), **लो. टिळक लेखसंग्रह** (१९६९), **मराठी विश्वकोश** (१४ खंड) प्रसिध्द झाले आहेत.

अनुक्रमणिका

इतिहास संशोधक श. ना. जोशी यांनी वाईला १९१७ मध्ये वसंत व्याख्यानमालेची सुरुवात केली. या व्याख्यानमालेस प्रतिथयश साहित्यिक, धर्मपंडित, शास्त्रज्ञ, कलावंत व विचारवंतांचा लाभ झाला असून १९७८ पासून ही व्याख्यानमाला लोकमान्य टिळक स्मारक संस्था चालविते.

जिल्ह्यातील साहित्य परंपरेच्या इतिहासात साहित्य संमेलनाचे स्थान बरेच महत्त्वाचे आहे. सन १९०५ मध्ये साताऱ्याला तिसरे (र. पा. करंदीकर, अध्यक्ष), १९६२ मध्ये ४४ वे (न. वि. गाडगीळ), कराडला १९७५ मध्ये ५१ वे (दुर्गा भागवत) व १९९३ मध्ये साताऱ्याला ६६ वे (विद्याधर गोखले) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते.

## नाट्यक्षेत्र

जिल्ह्यातील अनेक नामवंत नाटककार आणि कलाकारांनी महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात मोलाची भर टाकली आहे. मराठी रंगभूमीचे आद्य जनक विष्णुदास भावे यांच्या सीतास्वयंवर या पौराणिक नाटकाचा प्रयोग साताऱ्याला १८४४ मध्ये छत्रपतींच्या वाड्यावर झाल्याची नोंद आढळते, तर १८५० मध्ये कराडला कराडकर नाटक मंडळीतर्फे पौराणिक नाटके सादर केली जात. कराडच्या परमानंद अण्णाबुवा प्रासादिक नाट्यसंस्थेचा (१८५३) ऐतिहासिक नाटकांवर भर होता. रंगमंचावर महिलेने काम करणे तत्कालीन समाजाला रूचणे कठीण असतानादेखील या संस्थेच्या नाटकांमध्ये सखूबाई कराडकरने नायिकेच्या भूमिकेत मराठी रंगमंचावरील पहिल्या अभिनेत्रीचा मान मिळविला. या संस्थेने गावोगावी नाट्यप्रयोग केले. सन १८९२ मध्ये मनमाडला सखूबाईच्या नाटकाचा प्रयोग काही सनातन्यांनी बंद पाडल्याबद्दल १८ जुलै १८९२ च्या **इंदुप्रकाश** मध्ये त्याचा निषेध करण्यात आला होता.

सातारा, वाई, कराड परिसर सनातन्यांचा असूनही नाटकांची आवड लक्षणीय होती. वाईच्या महादेवशास्त्री गो. कोल्हटकरांनी शेक्सपिअरच्या **ऑथेल्लोचे** (१८६७) भाषांतर केले. इंग्रजी नाटकाचा मराठीतील हा पहिलाच अनुवाद होय.

जेष्ठसुधारक गो. ग. आगरकरांनी शेक्सपिअरच्या **हॅम्लेटचे विकार-विलासित** (१८८३) हे नाटक अनुवादित करून मराठी नाट्यक्षेत्रात मोलाची भर टाकली. विट्याच्या माधवराव पाटणकरानी **सत्यविजय, विक्रम, शशिकला** (१८९१) ही नाटके लिहिली. त्यांची नट व गायक म्हणून चांगली ख्याती होती. सन १८९२ मध्ये साताऱ्याच्या वासुदेव रंगनाथ शिरवळकरांनी **राणा भीमदेव** नाटक लिहिल्याची नोंद आढळते. [श्री. रा. जोग (संपा.), **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड ५, भाग-२, पृ. २२.] ते शेरिडनच्या **पिझाराचे** रूपांतर होते. शिरवळकरांची इतर नाटके **पानपतचा मुकाबला** (१८९३), **पन्नारत्न** अर्थात **दिव्य राजनिष्ठा** (१९१२), **श्री तुकाराम** (१९०१), **श्री एकनाथ** (१९०३), **श्री नामदेव** (१९०४) ही होत. त्यांच्या नाटकांचे अनेक प्रयोग झाले. सुरलीच्या नारायण वि. कुलकर्ण्यांचे (१८९२-१९४८) **पार्थप्रतिज्ञा** हे पहिले नाटक १९१७ मध्ये नाट्यकला प्रसारक संगीत मंडळीने रंगभूमीवर आणले. रसिकांमध्ये नाटकांची गोडी निर्माण झाल्याने सातारा न्यू इंग्लिश स्कूल, आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा हायस्कूल, द्रविड हायस्कूल (वाई) इत्यादी शिक्षण संस्थांच्या वार्षिक स्नेह संमेलनांतून विद्यार्थी नाटक सादर करू लागले व त्यातूनच कलाकार, दिग्दर्शक, नाट्यलेखक उदयास आले. यात प्रामुख्याने शां. गो. गुप्ते, निळकंठ आपटे, विठ्ठल वा. हडप, एस. डी. जोशी, अनंतराव पारसनीस, न. के. रानडे, वाईचे बाबुराव देशपांडे, डॉ. भाऊराव आगाशे, अण्णा भिडे, माधवराव टिळक, काशिनाथ आपटे, ग. वा. करंदीकर, डॉ. महाजनी, बंडोपंत

तळवलकर, भालचंद्र डांगे, पेंटर, पी. अनंत, अप्पासाहेब निगडीकर, बाबा कदम, बाबुराव दीक्षित, डॉ. पां. के. कोल्हटकर, गंगाधरपंत गोडबोले, कृष्णराव गोरे, छोटा गंधर्व तथा सौदागर अच्युत बळवंत कोल्हटकर, चित्तरंजन कोल्हटकर, जयमाला शिलेदार, अनंत दामले तथा नूतन पेंढारकर, बाळ कोल्हटकर, विसुभाऊ भडकमकर, सोनोपंत भागवत, राजाभाऊ कात्रे, वसंतराव कानेटकर, राजा परांजपे, राजा गोसावी व अलीकडील काळात नावारूपास आलेली सविता प्रभुणे आदींचा नामनिर्देश करणे अपरिहार्य आहे.

साताऱ्याच्या शां. गो. गुप्ते यांनी **रणरागिणी, संगीत वेणूनाद** ही पौराणिक नाटके तसेच **संगीत रक्तध्वज, हिरा हरपला, संगीत शिवसम्राट, सवतासुभा, तंट्या भिल्ल, संधी संग्राम व सीमांतपूजा** ही नाटके लिहिली. ते स्वतः नाट्यलेखक, दिग्दर्शक व उत्कृष्ट नट म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी आणि काशिनाथराव आपटे यांनी साताऱ्यास युसुफ बागवान, अच्युतराव मेहेंदळे, प्रि. चौगुले, जी. टी. जोशी इत्यादी नाट्यप्रेमींच्या सहकार्याने १९४३ मध्ये "अभिनव कलामंदिर" ही नाट्यसंस्था स्थापन करून नऊ वर्षे चालविली. गुप्ते यांनी त्यांची उपरोक्त नाटके तसेच रा. ग. कुंभोजकरांचे **संग्राम** नाटक रंगभूमीवर आणले. गुप्ते हे उत्कृष्ट कलाकार होते. त्यांची संभाजीची व बंडोपंत तळवलकरांची शिवाजीची भूमिका खूप गाजली.

संस्थेच्या नाटकात स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्या असा पायंडा संस्थेने पाडून शां. गो. गुप्ते व काशिनाथ आपट्यांनी आपल्या मुली पुष्पा व उषा गुप्ते, पद्मा आपटे यांना रंगभूमीवर आणले. पुष्पा गुप्तेचा **रणरागिणी** मधील राणी लक्ष्मीबाईच्या उत्कृष्ट भूमिकेबद्दल १९५६ मध्ये प्रांतिक नाट्यमहोत्सवात गौरव झाला होता. जी. टी. जोशी यांच्या गाननिपुण पत्नी सरोजाबाई जोशी यांनी **कीर्तिमंदिर** (सरस्वतीदेवीची भूमिका) व **दख्खनच्या** मोहऱ्यात भूमिका केली होती. त्याचप्रमाणे अक्काबाई पंत (औंध), प्रभा भागवत, प्रभा घैसास, दमयंती सावंत, माणिक काशिकर यांनीही स्त्री भूमिका केल्या.

स्त्री भूमिका समर्थपणे वटविणारे गंगाधरपंत गोडबोले यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांना नाटकाची अतिशय आवड, परंतु गरिबीमुळे ते शक्य नसल्याने नाटके पाहण्यासाठी त्यांनी साताऱ्याच्या गंधर्व नाटक मंडळीच्या (१९३४) डोअरकिपरची नोकरी पत्करली. सन १९३६ मध्ये त्यांनी **उसना नवरा** या नाटकात प्रथम स्त्री भूमिका केली. त्यांची **बेबंदशाहीतील चंद्रावळीची** भूमिका गाजली. त्याचप्रमाणे मालती, भामिनी, द्रौपदी, आनंदीबाई इत्यादी भूमिकाही त्यांनी समर्थपणे वटविल्या. सन १९३४ ते १९६० या कालावधीत त्यांनी **खडाष्टक, मी उभा आहे, जग काय म्हणेल, देवमाणूस, पेशवाईनंतर, रणरागिणी, तंट्या भिल्ल, हिरा हरपला, सुंदर मी होणार, आगऱ्याहून सुटका** वगैरे नाटकांतूनही भूमिका केल्या.

याच सुमारास डॉ. कोल्हटकर, मनोहरपंत भागवत, बंडोपंत तळवलकर, पी. अनंत, अप्पासाहेब निगडीकर, बाबासाहेब कदम, मधुकर जोशी, बाळासाहेब माजगावकर या **मंडळीनी बेबंदशाही, करीन ती पूर्व, झुंझारराव, आगऱ्याहून सुटका ही ऐतिहासिक, तसेच तुझे आहे तुजपाशी, अक्षांश रेखांश, वेगळं व्हायचंय मला, काचेचं घर, देव नाही देव्हाऱ्यात, सुंदर मी होणार, वेड लागले राधेला** वगैरे सामाजिक नाटके सादर केली. सन १९५९ मध्ये झालेल्या मुंबई राज्य ६ व्या नाट्य महोत्सवात **तुझे आहे तुजपाशी** या नाटकातील वासू अण्णांच्या भूमिकेबद्दल पी. अनंत यांना श्रेष्ठ अभिनयाचा पुरस्कार मिळाला होता. शां. गो. गुप्ते यांना शासनाकडून अभिनयाचे प्रशंसापत्र व त्यांच्या **उपेक्षित** या नाटकास रोख पारितोषिक मिळाले.

अनुक्रमणिका

साताऱ्यातील अभिनव कलामंदिर या अग्रगण्य संस्थेच्या सहकार्याने शाहू कलामंदिर हे खुले नाट्यगृह बांधण्यात आले. या कामी संस्थेचे आद्य संस्थापक शां.गो. गुप्ते व काशिनाथराव आपटे या मान्यवरांचे मोठे योगदान लाभले. पुढे त्यांनी कलामंदिर ही नवी नाट्यसंस्था स्थापन केली. कलामंदिर या संस्थेने सामाजिक बांधिलकीस्तव अनेक संस्थांना मदत केली.

डॉ. वि. ल. तथा भाऊराव आगाशे यांचे १९२८ मध्ये साताऱ्याच्या आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेत आगमन झाल्यावर संस्थेच्या मदतीसाठी त्यांनी अनेक नाट्यप्रयोग केले. या संस्थेच्या कलाकारांमधील स्त्री भूमिकेत गंगाधर गोडबोले, अच्युत खरे, रा. वि. पेंडसे, माधव दातार ही मंडळी तर पुरुष भूमिकेत जिगाजिन्नी, दादा पारसनीस, पां. के. कोल्हटकर, साने, एकनाथ गोडसे, दि. वि. साठे, बाळ माजगावकर, पी. अनंत, दिनकर भाकरे, यशवंत पेठे यांचा उल्लेख करता येईल. संस्थेने तोतयाचे बंड (१९४८), **बेबंदशाही** (१९४९), **घराबाहेर, उद्याचा संसार, दूरचे दिवे, भावबंधन, खडाष्टक, एखाद्याचं नशीब, वेगळं व्हायचंय मला, देव नाही देव्हाऱ्यात** (१९७२) इत्यादी नाटके सादर केली.

सातारा शहरातील विसुभाऊ भडकमकर, चिंतामणराव कोल्हटकर, चित्तरंजन कोल्हटकर, बाळ कोल्हटकर, सोनोपंत भागवत, राजाभाऊ कात्रे इत्यादी कलावंतानी साताऱ्याच्या बाहेर राहून महाराष्ट्रात खूपच कीर्ती मिळविली. रंगभूमीवर प्रॉम्पटरचे काम करणाऱ्या चित्तरंजन कोल्हटकरांनी कोल्हापूरला १९४४ मध्ये **भावबंधन** नाटकात महेश्वरच्या भूमिकेत रंगभूमीवर पहिले पाऊल टाकले. त्यांच्या **भावबंधन** मधील कामण्णाची व नंतर घनश्याम, **बेबंदशाहीतील** खंडोजी, **एकच प्याला** मधील तळीराम व सुधाकर, **गारंबीचा बापू** मधील बापू इत्यादी भूमिकांनी मराठी रसिकांची मने जिंकली. चितामणरावांच्या प्रत्येक शब्दास तलवारीची धार होती. दिनानाथ टाकळकरांबरोबर त्यांनी मराठी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. **गरीबांचे राज्य** हा त्यांचा पहिला चित्रपट. सन १९५४ मध्ये **ही माझी लक्ष्मी** या चित्रपटात खलनायक म्हणून पुढे आले. कोल्हटकरांनी संपूर्ण (१९९० पर्यंत) कारकिर्दीत सादर केलेल्या प्रयोगांची संख्या १० हजारापर्यंत पोहोचली. त्यांनी ७८ चित्रपटांत काम केले. विनोदी व खलनायकाच्या भूमिकांबरोबरच त्यांनी केलेल्या सामाजिक व ऐतिहासिक नाटकांतील भूमिका रंगभूमीच्या इतिहासात गाजल्या. अखिल भारतीय नाट्यमंदिर व नाट्यपरिषदेतर्फे रंगभूमीदिनानिमित्त रंगभूमीवरील श्रेष्ठ कलाकारास दिला जाणारा विष्णुदास भावे पुरस्कार ५ नोव्हेंबर १९९६ रोजी त्यांना मिळाला.

राजा गोसावींचा जन्म २८ मार्च १९२५ रोजी सिद्धेश्वर-कुरोली (ता. खटाव) येथे झाला. यांना लहानपणापासूनच नाटकाचे वेड होते. ते गंगाधरपंत लोंढे यांच्या "राजाराम संगीत मंडळीत" दाखल झाले. परंतु त्यांना नाटकात काम करण्याची संधी मिळाली नाही. त्यांनी प्रथम **चिमुकला संसार** या चित्रपटात भूमिका केली. पुढे **गजाभाऊ** व **बडी माँ** चित्रपटातून भूमिका केल्या. गोसावींनी दामु अण्णा मालवणकरांच्या प्रभाकर नाट्यमंदिर या कंपनीच्या **भावबंधन** नाटकाद्वारे रंगभूमीवर पहिले पाऊल टाकले. कंपनीच्या अनेक नाटकांतून त्यानी लहान सहान भूमिका केल्या. ते पुण्याच्या भानूविलास सिनेमागृहात बुकिंग क्लार्क म्हणून नोकरीस राहिले. यावेळी ते गणेशोत्सवातून छोटे-मोठे कार्यक्रम करीत असत. धर्माधिकारी यांनी **अखेर जमलं** या चित्रपटात राजाभाऊंना घेतले. या चित्रपटातल्या कामामुळे चित्रपट दिग्दर्शक राजा परांजपेनी त्यांना **लाखाची गोष्ट** या चित्रपटात प्रमुख भूमिका दिली आणि या चित्रपटाने इतिहास घडविला. विशेष म्हणजे या चित्रपटाचे तिकीट फाडण्याचे काम स्वतः राजाभाऊ करीत होते. या यशानंतर त्यांची चित्रपट कारकीर्द सुरू झाली. त्यांनी सुमारे २५० चित्रपटांतून भूमिका

अनुक्रमणिका

केल्या (त्यांच्या चित्रपटांची जागेअभावी यादी दिली नाही). त्यांनी **भाभी** व **स्कूल मास्टर** या हिंदी चित्रपटातही भूमिका केल्या होत्या.

चित्रपटातून राजा गोसावी गाजले तरी त्यांना स्थैर्य व समाधान दिले ते नाटकांनीच. त्यांची पहिली गाजलेली भूमिका बाबुराव गोखल्यांच्या **करायला गेलो एक** या नाटकामधील राजाभाऊ हर्षे ही होय. त्यानंतर त्यांनी रंगश्री नावाची स्वतःची नाट्यसंस्था काढली. या संस्थेच्या तसेच इतर संस्थेच्या होणाऱ्या **भावबंधन, एकच प्याला, प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव** या नाटकांतून भूमिका केल्या. त्यांच्या **भावबंधन** मधील कामण्णा, **प्रेम संन्यास** मधील गोकुळ आणि **एकच प्याला** मधील तळीराम या भूमिका प्रचंड लोकप्रिय झाल्या. **हा स्वर्ग सात पावलांचा, या घर आपलंच आहे, लग्नाची बेडी, तुझे आहे तुजपाशी** या नाटकांतील त्यांच्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. परंतु त्यांची सर्वात लक्षणीय ठरलेली नाटके म्हणजे **डार्लिंग डार्लिंग** व **सौजन्याची ऐशी तैशी**. **नटसम्राट** हे नाटकही त्यांनी अखेरच्या काळात केले. त्यातील गणपतराव बेलवलकर उभा करताना त्यांनी पूर्वसूरींहून वेगळी अत्यंत नैसर्गिक अभिनय शैली पूर्ण नाटकभर वापरली. त्यांनी संपूर्ण कारकिर्दीत सुमारे ६० नाटके केली. त्यांचे शेवटचे नाटक **भ्रमाचा भोपळा** हे होते. सन १९५५ साली बारामती येथे झालेल्या ७५ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमलनाचे ते अध्यक्ष होते. अखिल भारतीय नाट्यपरिषदेने बालगंधर्व पुरस्कार देऊन त्यांच्या अभिनयाचा गौरव केला.

सुप्रसिद्ध नाटककार बाळ कोल्हटकरांनी मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाचे दर्शन आपल्या विविध नाटकांतून चित्रित केले. **वाहतो ही दुर्वांची जुडी** मधील त्यांची भूमिका अविस्मरणीय ठरली. तसेच **वेगळं व्हायचंय मला, सीमेवरुन परत जा, एखाद्याचे नशीब** ही नाटके विशेष गाजली. त्यांनी **देव दिना घरी धावला, उघडले स्वर्गाचे दार** ही नाटके लिहिली.

स्वतःच्या स्वतंत्र प्रतिभेने मराठी रंगीभूमीला सतत उर्जितावस्थेत ठेवणारे प्रतिभासंपन्न नाटककार वसंत शं. कानेटकर यांचा जन्म (२० मार्च १९२२) सातारा जिल्ह्यातील रहिमतपूरचा. **वेड्याचं घर उन्हात** (१९५७) हे त्यांचे पहिले नाटक. **प्रेमा तुझा रंग कसा** (१९६१), **रायगडला जेव्हा जाग येते** (१९६१), **मत्स्यगंधा** (१९६४), **अश्रूंची झाली फुले** (१९६६), **लेकुरे उदंड जाहली** (१९६६), **मला काही सांगायचंय** (१९७०) आणि **हिमालयाची सावली** ही त्यांची विशेष उल्लेखनीय नाटके होत. याशिवाय **इथे ओशाळला मृत्यु** (१९६८), **घरात फुलला पारिजात** (१९६९), **अखेरचा सवाल** (१९७४), **गोष्ट जन्मांतरीची** (१९७८), **गगन भेदी** (१९८२), ही नाटकेही रंगभूमीवर गाजली. **वेड्याचं घर उन्हात** या नाटकास महाराष्ट्र नाट्यमहोत्सवात (१९५८) लेखनाचे पारितोषिक मिळाले. तसेच **रायगडाला जेव्हा जाग येते** या नाटकास संगीत नाटक अकादमीचे पारितोषिक (१९६४) मिळाले.

मराठी रंगभूमीवर संगीत नाटकात महाराष्ट्राचे भूषण ठरलेले स्वरराज छोटा गंधर्व तथा सौदागर नागनाथ गोरे (सन १९१८-१९९७) हे कोरेगाव जवळच्या भाडळे गावचे. कलेची व गायनाची जाण असणारे दामुअण्णा जोशींनी छोटा गंधर्वांना पुढे आणले. ते वयाच्या १० व्या वर्षी १९२८ मध्ये " प्राणप्रतिष्ठा " या नाटकातून प्रथम रंगभूमीवर आले. " जीव कसा हुरहुरे " हे त्यांचे पहिलेच पद. यानंतर या जिद्दी कलावंताचा रंगप्रवास सुरू झाला. त्यांना आवाज व कुशाग्र बुद्धीची जन्मजात देणगी होती. त्यांच्या पहिल्या नाटकातील गाणे एकून साहित्यसम्राट न. चिं. केळकरांपासून अनेक मान्यवरांनी त्यांच्या गाण्याची व गोड आवाजाची स्तुती केली. यांचा आवाज गंधर्वासारखा असल्याने आपल्या नाटकाच्या जाहिरातीत ते सौदागरांचा उल्लेख "छोटा गंधर्व" असा करत. याचा इतका परिणाम झाला की, लोक त्यांना " छोटा

गंधर्व " या नावानेच ओळखू लागले. सन १९२९ मध्ये श्रीमद शंकराचार्यानी सौदागरांना "बाल किन्नर" ही पदवी दिली. त्यांनी **स्वर्गावर स्वारी, मूर्तिमंत सैतान, कर्दनकाळ, माझा देश** या बालमोहनच्या नाटकांमधून नव्या भूमिका तसेच **सौभद्र, मानापमान, मृच्छकटिक, शारदा, विद्याहरण, संशयकल्लोळ** इत्यादी संगीत नाटकांमधून छोटा गंधर्वानी सादर केलेल्या भूमिकांमधून मराठी रंगभूमीच्या इतिहासात स्वतःचे युग निर्माण केले व दोन हजारांपेक्षा जास्त संगीत नाट्यप्रयोग सादर केले. सन १९३३ पर्यंत ते स्त्री भूमिका करीत असत. त्यानंतर त्यांनी पुरुष भूमिका करावयास सुरुवात केली. त्यांच्या याही भूमिका खूप गाजल्या. सन १९६३ मध्ये त्यांनी सहकाऱ्यासमवेत कलाविलास ही नाट्यसंस्था स्थापन केली. या संस्थेने अनेक संगीत नाटके सादर केली. नरहरीबुवा पाटणकर, दत्तबुवा बागलकोटकर, सवाई गंधर्व, कोल्हापूरचे भुर्जिखान इत्यादी गुरुंचे त्यांना मार्गदर्शन लाभले. तथापि १९३९ मध्ये उस्तादबाबा सेंदेखान अवलिया यांचे त्यांनी (गंडा बांधून) शिष्यत्व पत्करले. रात्री दहाच्या सुमारास नाट्यप्रयोगाला आरंभ करणारा हा कलावंत आपल्या गाण्याने व अभिनयाने असंख्य रसिकश्रोत्यांना आठ-आठ तास खिळवून ठेवत असे. सन १९८० मध्ये ६० व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. सन १९८१ मध्ये मुंबईत संगीत नाटकांचा मोठा महोत्सव झाला. त्याची सांगता छोटा गंधर्वाच्या "सौभद्र" ने झाली. दिनांक ३० डिसेंबर १९९७ ला गंधर्वाचे निधन झाले व शेवटचा गंधर्व गेला.

औंधच्या बापूसाहेब पंतानी **अमृतसिद्धी** नाटकात मुख्य नायकाची भूमिका केली होती. नाटकासाठी पार्श्वगायकाचा वापर त्यांनी केला पण तो प्रेक्षकांना कळला नाही अशी त्यांची अभिनय निपुणता होती. व्यंकटेश माडगुळकर यांच्या **सती, जाणार कुठं** या नाटकांनी रंगभीवर काही काळ चोखंदळ प्रेक्षकांची मर्जी संपादन केली.

सांस्कृतिकदृष्ट्या अग्रेसर असलेल्या व कलेची परंपरा लाभलेल्या वाई नगरीत जुन्या पिढीतील कृष्णराव गोरे, मोरोबा वाघोलीकर, अंतोबा दादा, पांडोबा गुरव, भाऊराव कोल्हटकर, बाबुराव देशपांडे, सहस्त्रबुद्धे, जयराम शिलेदार, अनंत शं. दामले तथा नूतन पेंढारकर इत्यादी नाटककार व नट उल्लेखनीय आहेत.

कृष्णराव स. गोरे (१८८०-१९४०) हे महाराष्ट्र रंगभूमीवरील प्रथम श्रेणीचे गायक नट होते. सन १८९२ चे सुमारास त्यांनी किर्लोस्कर कंपनीत प्रवेश केला. कादंबरी (**शापसंभ्रम**), वसंतसेना (**मृच्छकटिक**), इंदिरा काकू (**शारदा**), सरोजिनी (**मूकनायक**), सौदामिनी (**गुप्त मंजुष**), रमण (**कुंजविहारी**), शुक्राचार्य (**विद्याहरण**), कृष्ण (**सौभद्र**), धैर्यधर (**मानापमान**), अशा अनेक स्त्री-पुरुष भूमिका त्यांनी केल्या. ते बालगंधर्व कंपनीतील गायक नटही होते. त्यांची **शारदा** नाटकातील इंदिरा काकूची भूमिका व **मृच्छकटि**क मधील चारुदत्ताची भूमिका विशेष गाजली. त्यांची अस्खलित वाणी, पहाडी आवाजातील संवाद व पदे अद्यापही वाईकरांच्या स्मरणात आहेत. त्यांच्या बरोबर नाटकात स्त्री व पुरुष भूमिका करणारे गायक नट अनंत दामले उत्कृष्ट अभिनेता म्हणून नावलौकिकास आले. त्यांनी ललित कलादर्शनच्या अनेक नाटकांतून महत्त्वपूर्ण भूमिका केल्या. तथापि, त्यांची नारदाची भूमिका फारच गाजली. वाईचे बाबुराव देशपांडे हे उत्तम लेखक, नट व दिग्दर्शक होते. त्यांनी लिहिलेले **उमाजी नाईक** या नाटकाचे प्रयोग महाराष्ट्रात झाले व त्यांची भूमिकाही गाजली. याशिवाय **महासती वृंदा, राणी लक्ष्मीबाई, भांगेची तार** इत्यादी नाटके त्यांनी लिहिली. मोरोबा वाघुलीकरांचा आवाज दणकट व भरदार होता. किर्लोस्कर मंडळीच्या **शाकुंतल** नाटकातील दुष्यंताला म्हणावी लागणारी पदे ते अनायास म्हणत.

अनुक्रमणिका

प्रथम तमाशाच्या फडातच असल्याने लावणीच्या ढंगाने गाण्यात ते कुशल होते. त्यांच्या दुष्यंत व अर्जुनाच्या भूमिका अप्रतिम होत्या.

यमुनाबाई वाईकर यांनी तमाशाचे अनेक फड गाजविले हे खरे, पण त्याहीपेक्षा त्यांनी **धर्मवीर संभाजी, संशय कल्लोळ, मोहित्यांची मंजुळा, महाराची पोर** या मराठी नाटकांमध्ये केलेल्या भूमिका उल्लेखनीय आहेत.

दोन दशकापूर्वी वाईच्या शाहीर कृष्णराव साबळे यांच्या **आंधळं दळतंय** व **धर्मराज्यातील एक रात्र** ही लोकनाट्ये अतिशय गाजली. [याबाबत अधिक **माहिती** शाहिरी या विभागात पहावी.] चालू दशकांमध्ये वाईच्या सविता प्रभुणेंनी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा या दिल्लीच्या संस्थेत शिक्षण घेऊन मराठी रंगभूमी व चित्रपटसृष्टीत स्वतंत्र कलागुणांनी लोकप्रियता मिळविली असून त्या अनेक पुरस्कारांनी गौरविल्या गेल्या आहेत. त्यांनी **निष्पाप, चित्कार, कार्टी श्री देवी, तू फक्त हो म्हण, देखणी बायको दुसऱ्याची, महाराणी पद्मिनी, षडयंत्र** इत्यादी नाटकांतून भूमिका केल्या. तसेच मराठी चित्रपट व दूरदर्शन मालिकांतून मुख्य नायिका म्हणून काम केले आहे.

वाईच्या नाट्यसृष्टीत गौरवास्पद कामगिरीत द्रविड हायस्कूलचा मोठा वाटा आहे. त्यातून दिग्दर्शक व नट उदयास आले. त्यामध्ये गजानन कृष्ण गोडबोले, गणेश भट, रविंद्र भट यांचा उल्लेख करावा लागेल. सन १९५० मध्ये स्थापन झालेल्या "कलावृंद" संस्थेने नाट्यकला जोपासली. सन १९७४ मध्ये स्थापन झालेल्या "प्रतिक थिएटर्सने" (१९७४) वाईच्या नाट्य चळवळीत मोठे योगदान दिले आहे. राज्य नाट्य स्पर्धेत संस्थेच्या **चांदणे शिंपीत जा, समोरच्या घरात, अखेरचा सवाल, सौजन्याची ऐशी तैशी, सभ्य गृहस्थ हो** या नाटकांना विविध प्रकारची पारितोषिके मिळाली. प्रा. दिलीप जगताप यांनी प्रायोगिक रंगभूमीसंबंधी विपुल लेखन केले असून त्यांची काही प्रसिद्ध नाटके म्हणजे **गोंड्याने घातला घोळ, एक अंड फुटलं, एक असतो राजा, आला रे राजा** ही होत. ते उत्कृष्ट दिग्दर्शकही आहेत.

नाट्य कलेस उत्तेजन देण्याच्या उद्देशाने कराड येथे "नाट्यविकास मंडळ" ही संस्था १९४० मध्ये स्थापन झाली. या व्यतिरिक्त जिल्ह्यात "अद्वैत रंगभूमी" (१९६७), "लोकरंगमंच" (१९८१), "नाट्यासक्त ग्रुप" (१९७८), "बालकुंज नाट्यसंस्था" (१९८४), "अदाकार नाट्यसंस्था", कराड (१९८७) या व इतर अनेक संस्था ग्रामपातळीवर नाट्यक्षेत्रात कार्यरत आहेत.

साताऱ्याला शाहू कलामंदिर (स्था. १९५५) खुले नाट्यगृह व कराडला यशवंतराव चव्हाण स्मृतिभवन नाट्यगृह (१९८७) आहे. जिल्ह्यात १९५८ मध्ये ४० वे आणि १९९० मध्ये ७१ वे अखिल भारतीय नाट्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्याचे अध्यक्ष अनुक्रमे वि. स. खांडेकर व माधव मनोहर होते, तर महाराष्ट्रात इतर ठिकाणी भरलेल्या नाट्य संमेलनांपैकी जिल्ह्यातील अध्यक्ष लाभलेली नाट्यसंमेलने पुढीलप्रमाणे : नाशिक (दुसरे, १९०६)-न. चि. केळकर ; पुणे (सहावे, १९१०)-चिं. ग. भानू; अहमदनगर (पस्तिसावे, १९४६)-वसंतराव कानेटकर ; कोल्हापूर (छत्तिसावे, १९४९)-वसंतराव कानेटकर ; कुर्ला (बावन्नावे, १९७१)-वसंतराव कानेटकर ; मुंबई (साठावे, १९८०)-छोटा गंधर्व ; इंदूर (अडूसष्टावे, १९८७)-चित्तरंजन कोल्हटकर आणि मुंबई (सत्तरावे, १९८९), शाहीर कृष्णराव साबळे.

# संगीत – वादन

जिल्ह्यातील संगीत परंपरेचा इतिहास फारसा ज्ञात नसला तरीही कला ही या जिल्ह्याने जोपासलेली दिसते. संगीताचे मूळ समर्थ रामदास व तत्कालीन कीर्तनकारांच्या रचनेत आढळते. केदार, बागेश्री, आसावरी, काफी अशा विविध रागांमध्ये त्यांनी बांधलेली पदे, त्यांच्या काही पदांतून आढळणारे तबल्याचे किंवा नृत्याचे बोल यावरून समर्थांचा संगीताभ्यास दांडगा होता हे लक्षात येते. बहुतांश कीर्तनकारानांही संगीताचे ज्ञान होते. त्यांच्या कीर्तनात व भजनात गायनाचे प्रकार ऐकावयास मिळत. तसेच शाहिरी परंपरेतील हैबती, सगनभाऊसारख्या शाहिरांनाही संगीताचे ज्ञान होते. बहुतांश शाहिरी रचना या शास्त्रोक्त रागांवर आधारित असत.

साताऱ्याच्या संगीत कलेला उत्तर मराठा काळात राजाश्रय होता. येथील राजघराण्याने संगीतकारांना उत्तेजन दिले. पहिले प्रतापसिंह महाराज (१८१०-१८३९) यांनी वारिस अली खाँ यांना राजाश्रय देऊन त्यांच्यासाठी गोपाळपेठेत वाडा बांधून देऊन साताऱ्यातील संगीतास अनुकूल वातावरण निर्माण केले होते. दुसरे राजाराम महाराज तथा आबासाहेब महाराज (१८६५-१९०४) आणि त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव शिवाजीराजे तथा अण्णासाहेब महाराज हे संगीतप्रेमी होते. अण्णासाहेब तर चांगले सतारवादकही होते. त्यांचे धाकटे बंधु प्रतापसिंह तथा भाऊसाहेब महाराज यांनी सखारामबुवा आगळे वस्ताद (इंदूरचे नानासाहेब पानसे यांचे पट्टशिष्य) यांजकडून पखवाज आणि तबला वादनाचे शिक्षण घेतले होते. त्यासाठी सखारामबुवांना दरमहा ५०० रुपये वेतन देण्यात येई. सखाराम बुवाचे पुत्र अंबादास यांनाही महाराजांनी आश्रय दिला होता. स्वतःबरोबरच अनेक संगीतप्रेमी विद्यार्थ्यांनाही संगीत शिक्षणाची संधी भाऊसाहेब महाराजांनी मिळवून दिली. भाऊसाहेब महाराजांनी अब्दुल करीम खाँ, निसार हुसेन खाँ, पं. कृष्णराव, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर अशा नामवंतांचे कार्यक्रम साताऱ्यास घडवून आणले.

जिल्ह्यात प्रामुख्याने ग्वाल्हेर घराण्याची गायकीची परंपरा दिसते. तसेच येथे पं. विष्णु दिगंबर पलुस्करांचा शिष्यवर्ग आढळतो. साताऱ्यात मटंगे, ठाकुरदासबुवा आणि बालाजीबुवा गवई ही घराणी संगीत व वादनात उल्लेखनीय आहेत. जगन्नाथबुवा ठाकुरदास यांच्या घराण्यात धृपद, धमार व टप्पा गायकीची परंपरा जोपासण्यात येते. बालाजीबुवा गवई हे धृपद गायक होते. सन १८९९ मध्ये वाईस पांडुरंग गणेश यवतेश्वर तथा पांडोबा गुरव (यवतेश्वरकर) यांनी "वाईकर संगीत मंडळी " स्थापन केली होती. तिच्यातील गायक नट स्वतः धृपदिये होते. पांडोबा स्वतः मुरब्बी गवई होते. त्यांचे शिक्षण उत्तरेकडील नामांकित धृपदिये वझीर खाँ यांचेकडे थोडे फार झाले होते. नाट्य-संगीताला शुद्ध, शास्त्रीय व बैठकीच्या गायनाचा दर्जा देण्याचा त्यांनी विशेष प्रयत्न केला. नाट्यसंगीतात कृष्णराव गोरे यांनी गंधर्व नाटक कंपनीतून आपल्या सुरेल व पहाडी आवाजाने कीर्ती प्राप्त केली होती. तर नूतन पेंढारकर तथा अनंत दामले व जयमाला शिलेदार या वाईकरांनी शास्त्रोक्त संगीत व नाट्यसंगीतात प्रसिद्धी मिळविली. जुन्या पिढीतील ख्यातनाम पखवाज वादक अंतोबा गुरव यांचे महाराष्ट्रात कार्यक्रम होत. उत्तम साथीदार म्हणून त्यांचा लौकिक होता. तसेच पखवाज व तबला लयकारीचे विविध अंगाने पेश करण्याचे कसब त्र्यंबक दादा भोजने यांच्यातही होते. हे दोघेही इंदूरच्या पखवाज वादक नानासाहेब पानसे यांचे शिष्य होते. वाईच्या घराण्यानेही संगीत व वादन क्षेत्रात उल्लेखनीय नावलौकिक प्राप्त केला असून मृदंगाचार्य मार्तंड शास्त्री चौंडे हे उत्कृष्ट मृदंगवादक होते. भाडळीचे (कोरेगाव) सौदागर नागनाथ गोरे तथा स्वरराज छोटा गंधर्व यांचा नाट्यसंगीतातील लौकिक सर्वश्रुत आहेच. औंधचे पंतप्रतिनिधी भवानराव तथा बाळासाहेब यांचा संगीत व्यासंग उल्लेखनीय होता. त्यांच्या वडिलांच्या कारकिर्दीत नामांकित गवय्ये आश्रित म्हणून राहत

होते. जगदंबादेवीच्या नवरात्रोत्सवाच्या वेळी औंधला महाराष्ट्र व उत्तर हिंदुस्थानातील मोठमोठ्या नामवंतांचे गायन-वादनाचे कार्यक्रम होत. ग्वाल्हेर घराण्याचे खंदे आधारस्तंभ अनंत म. जोशी व त्यांचे पुत्र गजाननबुवा जोशी यांनी संगीत क्षेत्रात उत्तम कार्य केले. शिवानंद स्वामी प्रतिष्ठानतर्फे प्रतिवर्षी औंधला संगीत महोत्सव साजरा होतो. कराड हे कलासक्त शहर असून येथेही संगीताची जोपासना झालेली दिसते. पलुस्कर पुण्यतिथी, स्वरनिर्झर संस्थेचे उपक्रम, कृष्णाबाई उत्सव स्पर्धा इत्यादीमधून संगीताला पोषक वातावरण निर्माण होत गेले. सन १९३९ मध्ये येथे अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची शाखा सुरू झाली.

सद्या डोंबिवलीत राहणारे व "सदाशिव ॲकॅडमी ऑफ म्युझिक" या संस्थेचे संस्थापक सदाशिव पवार हे याच जिल्ह्यातले. ते उत्कृष्ट तबलावादक असून त्यांनी सुप्रसिद्ध तबलावादक उस्ताद अमीर हुसेन खाँ यांच्या हाताखाली तबल्याचे शिक्षण घेतले. त्यांनी सुप्रसिद्ध गायकांना तबल्याची साथ केली आहे. त्यांचा अनेक संस्थांनी सत्कार केला आहे.

## शाहिरी

जिल्ह्यात नाथपंथी सिद्धनाथाच्या प्रयत्नांमुळे शाहिरीचा प्रसार झाला. इ. स. १०५० पासून वाई पंचक्रोशीत नाथपंथी सिद्धनाथाचे वास्तव्य होते. त्यावेळी त्याने येथे अद्वैत भक्तीचे पीठ निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. पंधराव्या शतकात वाईस नाथपंथी अद्वैत भक्तीचा प्रचार करणारा रावळसिद्ध गोविंदसागर येऊन स्थायिक झाला. त्याने येथे कलगीची नाथपंथी शाहिरी परंपरा रुजविली. [शिवाजीराव चव्हाण, **शाहीर हैबती**, १९९०, पृ.१४.] त्याच्या परंपरेतील शाहीर कवींपैकी शाहीर गोविंदराव व शाहीर सिद्धनाथ यांची कवने आजही उपलब्ध आहेत, याच सिद्धनाथाचा शिष्य म्हणजे पेशवाईतील प्रसिद्ध शाहीर सगनभाऊ होय. [शिवाजीराव चव्हाण, "डफतुणतुणे", **५१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन : कराड, स्मरणिका**, १९७५, पृ. ७] पेशवाईच्या अखेरच्या काळातील कलगी तुरा परंपरेतील शाहीर परशराम, रामजोशी, "तुरा सम्राट" म्हणून प्रसिद्धी पावलेले होनाजी बाळा, सगनभाऊ, प्रभाकर, अनंत फंदी यांनी बदलत्या परिस्थितीनुरूप शक्तिप्रधान "कलगी तुरा" शृंगारिकतेकडे झुकविल्यामुळे वीर रस व भक्तीची जागा शृंगाराने पटकावली. तरीसुद्धा नाथपंथी शाहिरांच्या शृंगारातही भक्तिभावच अधिक होता. नाथसंप्रदायाने कलगी तुरा शाहिरी लोकशिक्षणाचे एक साधन म्हणून विकसित केली. तथापि मराठेशाहीत ती पोटभरण्याचे साधन बनल्याने त्यात शृंगारिकता अधिक होती. त्यावेळी कोरेगाव तालुक्यातील त्रिपुटीस स्थिरावलेल्या गोपालनाथाने शहिरांना शृंगारिक कवने करण्यापासून परावृत्त करण्यास प्रारंभ केला. गोपालनाथाने मराठीत अनेक पदे रचली. त्याच्या काही हिंदी रचनाही उपलब्ध आहेत. त्याच्या रचना गोड व लयबद्ध असून आजही हजारो भक्तांना मुखोद्‌गत आहेत. "गोपालनाथ गाथा" हे अशा रचनांचे संकलन आहे. ह्याने कराड तालुक्यातील कार्वे गावाचा शाहीर शेख सुलतान यास शृंगारिक कवने करण्यापासून परावृत्त केले. तसेच त्याच्याकडून अध्यात्मिक स्वरूपाची सांप्रदायिक कवने करून घेऊन त्यास संत बनविले. गोपालनाथाने आपल्या कार्यासाठी खटाव तालुक्यातील डिसकळच्या हैबती घाडगेसारख्या शिष्याची निवड केली. शाहीर देवनाथ व बालनाथ लहरी यांना भेदीक शाहिरी कवनांच्या लेखनास प्रवृत्त केले. गोपालनाथ- पूर्व काळात रावळसिद्धाने वाई, पुसेसावळी, राजाचे कुर्ले, कराड येथे सांप्रदायिक वाङ्मयाचे संग्रह करून ठेवले होते. परंतु ते राजाश्रयाभावी तसेच पडून होते.

गोपालनाथाने आपला पहिला शिष्य हैबती घाडगेस भक्तिपर कवने करून गाणारा शाहीर केले. शृंगारप्रधान शाहिरीस प्रतिस्पर्धी निर्माण केला. त्याने शाहीर हैबतीला शिवभक्ती सिद्धांतांची जोड देण्याची प्रेरणा दिली. हैबतीने "कलगी सम्राट" म्हणून ख्याती मिळविली. हा प्रयोगशील कलावंत होता. त्याने स्वतः पायात चाळ बांधून भेदिक शाहिरीला नृत्य-नाट्याचे परिमाण प्राप्त करून दिले. तसेच पात्र विरहित तमाशाच्या फडाद्वारे लोकांना आत्मोन्नतीकारक भक्तीची शिकवण दिली. हैबतीपूर्व व हैबतीकालीन शाहिरांनी कीर्तनात लावणी केली, तर हैबतीने लावणीलाच कीर्तनाचा साज चढविला. त्याद्वारे त्याने संगीत, ज्योतिष व गणितासारख्या विषयांचे ज्ञान सामान्यांपर्यंत पोहचविले. गुरू आज्ञेनुसार हैबती पुसेसावळीस स्थायिक झाला. त्याने **रामायण** व **महाभारत** वर कवने लिहिली. तसेच **तूर्तबोध, आत्मानुभवग्रंथसार, श्रीनाथलीला विलास** व **अर्जुनगीता** हे ग्रंथ लिहिले. त्यामुळे मराठी शाहिरीस विकासाची गती प्राप्त झाली. पश्चिम महाराष्ट्रात हैबतीची परंपरा सांगणारे व त्याची कवने गाणारे शाहीर आजही आहेत. पुसेसावळीस दरवर्षी कलगी तुऱ्याच्या स्पर्धा होतात. आयुष्यभर उच्च-नैतिक मुल्यांच्या जोपासनेसाठी झगडणाऱ्या हैबतीची जीवनयात्रा १७७६ मध्ये समाप्त झाली.

शाहीर हैबतीच्या परंपरेतील प्रसिद्ध शाहीर मारूती जरे (ओझर्डे, ता. वाई) याने विपुल काव्यरचना केली. त्याची परंपरा त्याचा मुलगा खाशाबा जरे याने पुढे चालू ठेवली. हैबतीच्या परंपरेतील धोमच्या कलगी आखाड्याचे शाहीर नबीलाल, तात्याबा पोळ, रामचंद्र नायकवडी, अनुसयाबाई नायकवडी, बाबुराव सोनार हे प्रसिद्ध शाहीर होत. हैबतीच्या प्रयोगशिलतेची परिणती म्हणजे शाहीर पठ्ठे बापुराव तथा बापुराव कुलकर्णी (१८६६-१९४५) होत. बापुराव कराड तालुक्यातील रेठरे-हरणाक्ष [सध्या हे गाव सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात आहे.] येथील. त्यांचे शिक्षण औंधला झाले. बालपणातच त्यांनी हैबतीची कवने वाचली व भेदिक गाण्याचे फडही पाहिले. त्यामुळे शालेय जीवनातच त्यांना भेदिक कवने करण्याचा छंद लागला. पुढे नोकरी निमित्ताने बडोद्यात गेल्यावर तमाशा व जलशाचे फड पाहिल्यावर ते लावण्या लिहू लागले. त्यांनी हैबतीच्या भेदिक कवनांमधील प्रयोगशीलतेतून प्रेरणा घेऊन भेदिक शाहिरीत व तमाशात नवनवे प्रयोग सुरू केले. पहिल्या महायुध्दानंतर बदलत्या सामाजिक परिस्थितीनुरूपची गरज म्हणून त्यांनी "वगनाट्य" हा वाङ्मय प्रकार उदयास आणला. त्यासाठी **तात्या बापूचा फार्स, शूर शिपायाचा झगडा, सासू जावयाचा झगडा, नोकरीकरिता आलेल्या शूर शिपायाचा वग, गंगारामाचा व मिठाराणीचा वग** त्यांनी लिहिले व सुमारे दोन लाख लावण्या लिहिल्या. पठ्ठे बापुरावांनी आपल्या वगांव्दारे स्वातंत्र्य चळवळीस पोषक वातावरण निर्मितीचे महत्त्वाचे कार्य केले होते.

भिलवडीच्या तुरा शैलीचे शाहीर संभू-राजू (संभू कोष्टी तर राजू तांबोळी होता) या हैबतीकालीन शाहिरांनीही सामान्य माणसास आपल्या शाहिरीद्वारे अद्वैत भक्तीचा महिमा सांगितला. ज्योती गोपाळा हा समकालीन शाहीर पुसेसावळीचाच. तुरा शाहिरी शैलीचा श्रेष्ठ शाहीर चिलू सोनार कराड तालुक्यातील जखिणवाडीचा होता. त्याने जी कवने लिहिली ती बाबाजी नलवडेंनी गायिली. त्यामुळे ते शाहीर चिलुबाबाजी नावाने प्रसिध्दीस आले. कराडला कृष्णा-कोयनेच्या संगमावर पर्वणीच्या वेळी शाहिरांचे फड चालत. त्यात चिलू-बाबाजीचा सामना करू शकणारा शाहीर नव्हता. कलगी परंपरेतील कराडचा प्रसिध्द शाहीर बंडू दरवेशी होता. कराड भागात तुरा परंपरेचीच शाहिरी अधिक बहरली. त्यात कराडचा शाहीर याकूबभाई बागवान (१८७७-१९६७), जखिणवाडीचा शाहीर रामचंद्र गुरव (१९०२-१९७२) आणि शाहीर मारुती विभूते (१८१९-१९३४) होऊन गेले तर शाहीर बाबुराव सिंगोबा चव्हाण (कराड) व शाहीर राजाराम नलवडे (जखिणवाडी) हे तुरा शैलीची परंपरा आजही चालवित आहेत.

स्वातंत्र्य आंदोलन काळात राष्ट्रीय पोवाडे गाणारे अनेक शाहीर उदयास आले. त्यात निनाम-पाडळीचा शाहीर सदानंद प्रसिध्द होता. सत्यशोधक समाजाच्या प्रचारकांनी तमाशा व जलशांचे फड निर्माण करून त्याव्दारे सामाजिक अन्यायावर प्रकाश टाकण्याचे काम केले. त्यात भाऊ पाटोळे भिलवडीकर याचा फड खूप गाजला. स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रीय जागृतीचे काम करणाऱ्या शाहिरांना काळाची दिशा पाहूनच कार्य करावे लागले. या काळात जिल्ह्यात शाहीर कृष्णराव साबळे (पसरणी, ता. वाई) उदयास आले. त्यांनी आपल्या बुलंद वाणीने स्वातंत्र्याचा संदेश गावोगावी पोहोचविला. त्यांना "महाराष्ट्र शाहीर" म्हणून गौरविले असून त्यांचे "गर्जा महाराष्ट्र" हे गीत अतिशय लोकप्रिय ठरले. या शाहिराने लोकनाट्यातील गणगौळण प्रकारास फाटा देऊन मुक्त नाट्य हा नवीन प्रकार उदयास आणला. **इंद्राच्या दरबारात तमासगीर, नारदाचा रिपोर्ट, चित्रगुप्ताच्या दरबारात दारूड्या, कोड्याची करामत, कोयना स्वयंवर, नशीब फुटके साधून घ्या, बापाचा बाप, यमराज्यात एक रात्र, ग्यानबाची मेख, मीच तो बादशहा, आबुरावांचं लगीन, आंधळं दळतंय, असूनी मालक खास घरचा, माकडाला चढली भांग, फुटपायरीचा सम्राट, एक तमाशा सुंदरसा, कशी काय वाट चुकला** या मुक्त नाट्यांतून त्यांनी तत्कालीन राजकारणाविषयी व समाजकारणाविषयी लोकांना जागृत केले. त्यांनी १९४५ मध्ये सातारा जागृती मंडळ स्थापन केले. त्यानंतर शाहीर साबळे आणि पार्टीची स्थापना केली. सन १९५१ पासून लोकनाट्याचे व मुक्तनाट्याचे प्रयोग सुरू केले. त्यासाठी मोबाईल थिएटरची निर्मिती केली. त्यांना १९८४ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार व १९८८ मध्ये अमरशेख पुरस्कार मिळाला. सन १९८९ मध्ये ७० व्या अखिल भारतीय नाट्य परिषदेचे ते अध्यक्ष होते. तसेच त्यांना त्याचवर्षी "महाराष्ट्र गौरव" पुरस्कार मिळाला. सन १९९७ मध्ये रा. ना. गोडबोले सार्वजनिक ट्रस्टने "सातारा भूषण" पुरस्कार दिला. आनेवाडीचे शाहीर फरांदे यानी दारूबंदी प्रचाराचे भरीव कार्य केले.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने शाहिरीच्या उत्तेजनासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या. त्यामधूनच तमाशा परिषद आणि शाहिरी परिषद स्थापन झाल्या. त्याद्वारे गुणी कलावंताना मानधन दिले जाते. त्यामुळे खेडोपाडी अनेक तरुण शाहीर उदयास येत आहेत. शाहीर दादूभाई मुल्ला (रहिमतपूर, ता. कोरेगाव), दत्तोबा केळसकर (मसूर-कवठे, ता. कराड), बाळा भिसे (लोणी-भोसरे, ता. खटाव), सखाराम सूर्यवंशी (वाई), गजानन गुरव व लक्ष्मण क्षीरसागर (पुसेसावळी, ता. खटाव), लक्ष्मण लोहार (दिवशी बु., ता. कराड) हे कलगी शैलीचे; तर मारुती सावंत (मसूर-चिखली, ता. कराड), सोनबा पवार (वाई), दगडू गिमवेकर (अभेपुरी, ता. सातारा), गंगाराम तारू (शिरवळ, ता. खंडाळा), बाबुराव चव्हाण (कराड), लोकशाहीर यादव (कराड) यांनी तुरा शैलीची आपली परंपरा पुढे चालू ठेवली आहे. याशिवाय पांडूरंग दत्तात्रय खानविलकर, बी. डी. कराडकर, अच्युतराव कोल्हटकर, घनश्याम गणेश दातार, दामू अण्णा एकबोटे, मारोतराव हळबे, दादा साखळकर, बाळकृष्ण रामचंद्र जोशी हे ऐतिहासिक पोवाडे करणारे शाहीर जिल्ह्यातीलच होत.

अखिल भारतीय पातळीवर पोवाड्याच्या लेखन स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते शाहीर रामचंद्र खेडकर (दळवी) हे या जिल्ह्यातील तुरा परंपरेतील दत्त संप्रदायी सिध्दपुरुष होत. तसेच राज्य पातळीवर कलगी तुऱ्याचे नेतृत्व करणारे शाहीर अप्पासाहेब इनामदारही या जिल्ह्यातील होत.

अनुक्रमणिका

# तमाशा

महाराष्ट्रातील बहुजन समाजात लोकप्रिय असलेल्या या लोककला प्रकाराची निर्मिती १७व्या शतकात झाली. तत्पूर्वी गोंधळ, वाघ्या-मुरळी, बहुरूपी, दशावतार, वासुदेवाची गाणी, भेदिक लावणी असे विविध धार्मिक अधिष्ठान असलेली विधिनाट्ये अस्तित्वात होती. ती जनतेचे धार्मिक समाराधन व रंजन करीत होती. त्यातून काही गोष्टी घेऊन व त्यात काही स्वतंत्र तत्त्वांची भर घालून तमाशाची निर्मिती झाली असावी. साधारणतः शिवकालात युध्दाच्या निमित्ताने मुघल फौजा महाराष्ट्रात आल्या. त्या कित्येक ठिकाणी दीर्घकाळ तळ देऊन असत तेव्हा करमणुकीसाठी जवळपासच्या खेड्यातील गोंधळी, कोल्हाटी, बहुरूपे इत्यादींना बोलावून त्यांच्याकडून पोवाडे, लावण्या म्हणवून घेत. तसेच खेळ करवून घेत. या खेळालाच त्यांनी तमाशा नाव दिले. [अ.म. जोशी, **भारतीय लोकनाट्य**, १९८०, पृ. ४३.]

"तमाशा" हा शब्द मूळ फार्सी असून तो उर्दूतून मराठीत प्रचलित झाला. संत एकनाथाच्या "बाजेगरी" भारुडात "तमाशाचा" उल्लेख असून त्याला नंतरच्या काळात "खडी गंमत" म्हणून संबोधण्यात आले. संत रामदास स्वामींच्या रचनांमध्ये "डफगाणे" असा उल्लेख आहे. खडी गंमत, डफगाणे ही तमाशाची पूर्वरूपे आहेत. [प्रकाश खांडगे, " महाराष्ट्राच्या लोककला," **सांस्कृतिक महाराष्ट्र परिचय पुस्तिका**, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई, १९९७, पृ. १९.]

पेशवे काळातील शाहिरांमध्ये भेदिक गाण्यांची परंपरा होती. तीच जिल्ह्यातील शाहीर हैबती, संभू-राजू भिलवडीकर, सगनभाऊ, पठ्ठे बापुराव, दगडूबाबा साळी, भाऊ फक्कड यांच्यातही होती. यावरून भेदिक डफगाणे व तमाशाचा निकटचा संबंध होता. पुढे भेदिक तमाशा नावाचा प्रकार रूढ झाला. असा तमाशा गावच्या जत्रेत, ग्रामदेवतेच्या ठिकाणी अथवा वीर स्मारकांच्या समोर होत असे. गावचे पाटील व कुलकर्णी तमासगिरांना बोलावून तमाशा करीत. त्यावेळी महिलादेखील तमाशा पाहण्यास येत. कालांतराने भेदिक तमाशातील आध्यात्म जाऊन शृंगारिक तमाशा उदयास आला. तसेच संगीत बारी हा तमाशाचा नवीन प्रकारही रूढ झाला. पेशवाईच्या उत्तर काळात तमाशाची भरभराट झाली. यावेळी रामजोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा, सगनभाऊ, परशराम, प्रभाकर हे नामांकित शाहिर तमासगीर होऊन गेले. यापैकी सगनभाऊ हा याच जिल्ह्यातील असून शाहीर हैबतीच्या उदयानंतर तो पुण्यास स्थिरावला. या काळात शाहीर हैबती उदयास आला. त्याने शृंगारिकतेकडे झुकलेल्या तमाशास आध्यात्म्याची जोड देऊन अध्यात्मिक रूपकाच्या पातळीवरून "वरून तमाशा आतून कीर्तन " असा नवा प्रयोग सुरू केला. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. शाहीर पठ्ठे बापुराव कुलकर्णींनी हैबतीची परंपरा पुढे चालू ठेवली. याच काळात तमाशात नाच्या पोऱ्याऐवजी जिल्ह्यातील तबाजी हिवरगावकर या महार तमासगिराच्या पवळा हिवरगावकर या मुलीने प्रथमच तमाशाच्या फडात नाच केला. तबाजीने पवळास खंडोबाच्या नावाने मुरळी म्हणून सोडून वाघापूरला हरिबाबा घोलप व राणूजी रोहोम याचेकडे नाचगाणे शिकण्यासाठी ठेवले होते. हरिबाबाने पवळास प्रथमच आपल्या तमाशात नाचविले. त्यानंतर ती नामा धुळवडकराच्या तमाशात व तेथून बापुरावाच्या तमाशात गेली. बापुरावाचे नाट्यपूर्ण वग आणि पवळाच्या नजाकतीने जनतेस मंत्रमुग्ध केले होते. पवळा व पठ्ठे बापूराव ही तमाशातील सुप्रसिध्द जोडी ठरली. बापूरावांच्या लावण्यांच्या भांडवलावर अनेक तमासगिरांनी फड उभे केले आहेत. आज एकही तमासगीर असा नाही की जो त्यांची लावणी गात नाही.

अनुक्रमणिका

सन १८५६ च्या दरम्यान मराठी नाटकात फार्स हा प्रकार आला. त्याच धर्तीवर पठ्ठे बापुरावांचा "सासू जावयाचा शोध" हा तमाशातील पहिला फार्स होय. त्यानंतर तमाशात विपुल प्रमाणात गद्य स्वरूपाचे वग आले. दगडू बाबा साळीने पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक विषयांवर गद्य स्वरूपाचे वग लिहिले.

सन १९३० मध्ये बोलपट आल्यामुळे तमाशाकडे दुर्लक्ष झाले. तथापि, सत्यशोधक समाजाने तमाशाचे व जलशाचे फड उभे करून त्याव्दारे सामाजिक अन्यायावर प्रकाश टाकून लोकजागृती केली. त्यात भाऊ पाटोळे भिलवडीकरचा फड खूप गाजला. याच धर्तीवर १९३१ मध्ये डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी "आंबेडकरी जलसा" सुरू करून त्याव्दारे त्यांचे विचार जनतेपर्यंत पोहचविले. यात जिल्ह्याचा मोठा वाटा होता. सन १९४८ मध्ये शासनाने तमाशावर बंदी घतली. तथापि, तमाशा ही सांस्कृतिक कला असल्याने शासनाला ही बंदी उठवावी लागली. याच काळात तमाशावर चित्रपटांचा मोठा परिणाम झाला. तसेच पौराणिक वगाबरोबर ऐतिहासिक व सामाजिक वगांची लाट आली.

सन १८४३ ते १९२० हा कालखंड म्हणजे तमाशाचे सुवर्णयुग होय. या काळात अनेक वगनाट्ये उदयास आली. या काळात तमाशाने मराठी लोकवाङ्मयात मोलाची भर घातली. आध्यात्म आणि शृंगाराची पखरण करणाऱ्या अनेक लावण्या, वगनाट्ये या काळात लिहिली गेली. ब्रह्ममायेच्या वादापासून ते दुष्काळाच्या कथा-व्यथापर्यंत सर्वच विषयांचा या लोकप्रिय लोककलेने परामर्श घेतला.

जुन्या तमासगिरांबरोबर नवीन लोक आले. त्यात जिल्ह्यातील कांताबाई सातारकर, साहेबराव नांदवळकर, यमुनाबाई वाईकर हे गाजलेले तमासगीर होत. यमुनाबाईची संगीत गायन नृत्य पार्टी १९३५ पासून गाजत राहिली. त्यामुळे त्या राष्ट्रीय स्तरावरील तमाशा कलावंत ठरल्या व त्यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार व तमाशा परिषदेचे पहिले सुवर्णपदकही मिळाले. सन १९९५ मध्ये त्यांना नाट्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला. यमुनाबाईच्या प्रेरणेने द्वारका सातारकर, अनुसया सातारकर यांचे फड नावारूपास आले. जिल्ह्यातील रोशन सातारकरच्या लावण्या व लोकगीते प्रसिध्द आहेत. रोशन सातारकर व उषा वाईकर यांनी लोकनाट्य तमाशा जिवंत ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत तमाशाच्या बाजाने लोकनाट्याच्या रूपाने प्रबोधनाचे कार्य केले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या कलेला उर्जितावस्था प्राप्त होऊन गण, गौळण, रंबाजी, फार्स, वगनाट्य असा तमाशाचा आविष्कारक्रम सुरू झाला. परिणामी उघड्या पारावरच्या तमाशास पुण्या-मुंबईच्या थिएटरांमध्ये प्रतिष्ठा लाभली. [प्रकाश खांडगे, पूर्वोक्त, पृ. १९.] प्रौढ शिक्षण व आरोग्य विषयक कार्यात आजही जनजागृती व अभियानासाठी तमाशा ही लोककला प्रभावी माध्यम ठरत आहे.

## गोंधळ

हा कुलाचार म्हणून केला जाणारा विधी होय. लग्न, मुंज यांसारख्या प्रसंगी यजमानाच्या घरी गोंधळी कलाकार नृत्य, नाट्य व संगीत यासह देवीच्या नावाने गोंधळ घालण्याचा कार्यक्रम करतात. देवाची भक्ती व मनोरंजन हा त्यातील प्रमुख हेतू. देवीच्या स्मरणार्थ केल्या जाणाऱ्या पद्यात्मक नृत्यास गोंधळ असे म्हणतात. गोंधळाचे मूळचे स्वरूप भक्तिपर होते. कालांतराने त्यात पोवाडे, गायन व नकला यांचा समावेश करण्यात येऊ लागला. दक्षिणेत मुसलमानांचे राज्य आल्यानंतर त्यांच्या अत्याचाराचा

प्रतिकार करण्याच्या हेतूने तुळजाभवानीची सेवा रूढ झाली व त्यानिमित्ताने गोंधळ घालणारी गोंधळी लोकांची जातच निर्माण झाली. [अ. म. जोशी, पूर्वोक्त, १९८०, पृ. ९४३.]

गोंधळी रेणुकापुत्र परशुरामाला पहिला गोंधळी मानतात. गोंधळ हा दक्षिण भारतातील अतिप्राचीन स्थानिक नृत्यप्रकार असून त्यात लोक देवतेचे व भक्तांचे उन्नयन होत गेले. संबळ, तुणतुणे या वाद्यांच्या साथीने सादर होणाऱ्या गोंधळाचे रेणुराई व कदमराई असे दोन प्रमुख प्रकार आहेत. कदमराई गोंधळी म्हणजे तुळजापूरच्या भवानीचे उपासक. यांना हरदासी गोंधळी असेही म्हणतात. कदंबाच्या काळापासून गोंधळ महाराष्ट्रात प्रचलित असून कोल्हापूर, माहूर, तुळजापूर, पुणे, सातारा, सांगली आदि परिसरात रेणुराई गोंधळी व कदमराई गोंधळ्यांची परंपरागत घराणी आहेत. [प्रकाश खांडगे, पूर्वोक्त, पृ. १३.]

पेशवाईच्या अखेरीस होऊन गेलेला रामा गोंधळी हा सगनभाऊच्या तमाशात होता. तसेच तुकाराम, माधव, उदाजी, पांडू या गोंधळ्यांनीही तमाशात मोठी कामगिरी केली. भवानी देवीशिवाय भैरवनाथ व खंडोबा या देवतांच्या नावानेही गोंधळ घातला जातो. भैरवनाथाच्या भक्तास भराडी म्हणतात व त्यांच्या गोंधळ्यास भराड म्हणतात. भैरवनाथाच्या गोंधळ्यांची वस्ती अभेपुरी (ता. सातारा) येथे आहे.

गोंधळासारखीच वाघ्या-मुरळ्यांनी सादर केलेले "जागरण" ही वैशिष्ट्यपूर्ण नाट्यकलाही मराठी संस्कृतीत रूजली. खंडोबाचे नामसंकिर्तन करणाऱ्या वाघ्या-मुरळ्यांवर भागवत संप्रदायी संतांनी अनेक अभंगरूप रूपके रचली आहेत. वाघ्या-मुरळ्यांची समाजाकडून उपेक्षा होत असली तरी खंडोबाच्या भक्तांनी त्यांना लोकसंस्कृतीचे उपासक म्हणून वंदनीय मानले आहे. लग्न, मुंजीसारख्या मंगलप्रसंगी जागरण घालण्याचा कुळधर्म आहे. अशा प्रकारच्या गोंधळ्यांची वस्ती पाल-खंडोबाची (ता. पाटण) येथे आहे. जिल्ह्यात म्हसवडचे भराडी गोंधळी व औंधच्या यमाईचे गोंधळी प्रसिध्द आहेत.

## क्रीडाक्षेत्र

जिल्ह्यातील खेळाडूंनी कुस्ती, खो-खो, कबड्डी आणि इतर वैयक्तिक खेळांमध्ये जागतिक पातळीवर भारताचे वेळोवळी प्रतिनिधित्व केले. फार पूर्वीपासून जिल्ह्यात मल्लविद्येची चांगली परंपरा असून त्यात अनेकांना नावलौकिक प्राप्त झालेला आहे. साताऱ्याच्या छत्रपतींकडे अनेक पैलवान आश्रित असत. सर्वांचा येथे नामनिर्देश करणे शक्य नाही. महागावचे दामोदर बाळकृष्ण भिडे गुरुजींनी (१८७६-१९४८) आयुष्यभर व्यायाम प्रसाराचे कार्य केले. साताऱ्याचे गणपतराव साठे यांनी गजानन व्यायाम शाळा स्थापन करून अनेक पैलवान तयार केले. जिल्ह्यातील उमर पैलवान, भिडे गुरुजी, परांजपे (गुरुजी), थत्ते (गुरुजी), विठ्ठलराव सोमण, बन्सीलाल मोदी, तुकाराम भोसले, मारुतीराव गांबोळी, भावे गुरुजी, विठ्ठलराव कोमटी व महमदखान पैलवान यांनी नावलौकिक मिळविला. त्यांची परंपरा पुढे चालविणारे बाबाराया मोहिते, बळीराम चौकवाले, बाबुमियाँ कुरेशी, पापा पैलवान, श्रीरंग जाधव, कोंडीराम शिंगरे, साहेबराव पवार, गणपतराव साठे, बुवा गोसावी, निजाम पैलवान, शंकरराव घाटगे, कृष्णा परखंडीकर, गणपतराव डाळवाले, लक्ष्मण वीरमाडे, दगडू न्हावी, वामन पैलवान, बाबुराव वासके, शामराव मुळीक, राघू बनपुरी, मारुती वडार, मारुती रेठरेकर, गुलाब पैलवान, गंगाराम तेली, धन्नु तरडे, गणपत रायगांवकर, विठ्ठलराव जाधव, रामू शिवथरकर, शिवराम मोहोर, तुकाराम कामटी, रामचंद्र चव्हाण, रामभाऊ शिंगरे, गणपत काशिद, बाबुराव बर्गे, बाबुराव पवार, बाबू न्हावी, पांडू पैलवान, वामन पवार उंबरडेकर यांचा उल्लेख करण्यात येतो. गजानन व्यायाम शाळेच्या बाळकृष्ण चिंतामण आपटेंनी जिल्हा

पातळीवरील सामन्यात सुवर्णपदक मिळविले. माहुलीचे श्रीरंग विठ्ठल जाधवांनी हेलसिंकी येथे संपन्न झालेल्या (१९५२) ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते. ते बराच काळ महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे सचिव होते. रहिमतपूरचे बाबूराव काशिद यांनी मॅनिला येथील आशियाई स्पर्धेत रौप्यपदक मिळविले. [सातारा नगरपालिका, **आमचा सातारा**, १९६७ पृ. ३२.] कुस्तीला जागतिक पातळीवर मान मिळवून दिला तो कराडचे खाशाबा दादासाहेब जाधवांनी. त्यांना १९४८ मध्ये लंडन येथे संपन्न झालेल्या ऑलिंपिकमध्ये ऑस्ट्रेलियन व अमेरिकन मल्लांशी खेळण्याची संधी मिळाली. कुस्ती खेळून विजय मिळविला. तसेच त्यांनी हेलसिंकीच्या जागतिक ऑलिंपिकमध्ये सात देशांच्या मल्लांबरोबर व १९५४ मध्ये बुखारेस्टच्या (रुमानिया) जागतिक यूथ फेस्टीवलमध्ये तीन देशांच्या मल्लांबरोबर कुस्त्या खेळून विजय मिळविला. खाशाबांना १९५२ मध्ये कुस्तीतील पहिले ब्रॉंझ पदक मिळविण्याचा मान प्राप्त झाला. दादा माने व साहेबराव जाधवांनी महाराष्ट्र केसरीचा मान मिळविला. सन १९६२ मध्ये सातारा शहर तालीम संघ स्थापन झाला. कराड व वाई येथेही तालीम संघ कार्यरत आहेत. [कृ. गो. सूर्यवंशी, **भारतीय मल्लविद्या : उदय आणि विकास**, १९६५, पृ. ७०.][२६]

स्वदेशी खेळ व्यायाम प्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रात्यक्षिकांचा सोहळा १९१६ पासून साताऱ्यास सुरू झाला असून तो अद्याप चालू आहे. पहिल्या महायुद्धानंतर शांतता प्रवर्तक समितीतर्फे सामने भरविण्यात येत. पुण्याच्या डेक्कन जिमखान्याच्या प्रोत्साहनाने १९२१ मध्ये सातारा जिल्हा आणि औंध, फलटण, भोर इत्यादी संस्थानांतील क्षेत्रांसाठी साताऱ्यास मोठ्या प्रमाणात सामने भरविण्यात आले. परिणामी पुढे जिल्ह्यात अनेक मंडळे व व्यायाम संस्था स्थापन झाल्या. त्यातून अनेक नामवंत खेळाडू पुढे आले. कबड्डी व लंगडी या खेळांच्या सामन्याचे नियमही प्रथम सातारा जिल्हा मंडळानेच प्रसिद्ध केले. खेळाची संघटना म्हणून १९२८ मध्ये पुण्यास अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाची स्थापना झाली. सातारा जिल्हा सामना मंडळाचे १९३८ मध्ये अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाच्या शाखेत रूपांतर झाले. सन १९३९ मध्ये या शाखेमार्फत मंडळाचे अधिवेशन साताऱ्यास झाले होते. मंडळाचे कार्य आजही चालू आहे. याशिवाय साताऱ्याचा युनियन क्लब (१८८९), साताऱ्याची गजानन व्यायाम शाळा (१९२०) व आर्य क्रीडा मंडळ या दोन मंडळांच्या विलिनीकरणातून निर्माण झालेले व्यायाम मंडळ, साताऱ्याचे श्रीकृष्ण मंडळ (१९२१) व वीर अभिमन्यू मंडळ, बोगदा (सातारा); इलेव्हन मंडळ, वीर धवल क्रीडा मंडळ, नूतन युवक मंडळ, महात्मा गांधी क्रीडा मंडळ, सातारा (१९२२); श्री शिवाजी उदय मंडळ, सातारा (१९४५); भारतमाता मंडळ, सातारा (१९४९); पाटण स्पोर्टस् असोशिएशन, नवरत्न क्रीडा मंडळ, कराड; कराड नगरपालिका सेवक संघ, शिवाजी क्रीडा मंडळ, कराड; अजंठा युवक क्रीडा मंडळ, कराड; लिबर्टी मजदूर मंडळ, कराड इत्यादी मंडळे क्रीडा क्षेत्रात कार्यरत असून त्यातील खेळाडू अखिल भारतीय पातळीपर्यंत पोहोचलेले आहेत.

कबड्डीपटू बबनराव उथळे यांच्या शिवाजी उदय मंडळाच्या कुमार कुलकर्णी, नरेंद्र दाभोळकर, बबनराव उथळे, विजय जाधव वगैरे खेळाडूंनी शिवछत्रपती पुरस्कार मिळविले तर नंदा जाधवने धावण्याच्या शर्यतीत विक्रम प्रस्थापित केला आहे. श्रीकृष्ण क्रीडा मंडळाचे शंकरराव गोसावी यांनीही कबड्डी महर्षी किताब मिळविला आहे. सन १९७७ मध्ये साताऱ्याला शाहू स्टेडियम सुरू झाले.

कराडचे लिबर्टी मजदूर मंडळ (१९५४) प्रसिध्द असून त्याची वेगळी परंपरा आहे. मंडळाचे खेळाडू जिल्हा, राज्य तसेच अखिल भारतीय पातळीवर चमकत आहेत. मंडळाचे कबड्डीमध्ये विशेष नैपुण्य असल्याने बाळकृष्ण सनाप्पा उर्फ बालक रेपाळ, बशीर इनामदार, मानसिंग पाटील, धोंडीराम भोसले, वसंत सोनावले, रमणीक गुजर, सुहास डोळ, ज्ञानू कांबळे, शंकर गर्गे, नूरमहमद मोमीन, विठ्ठल

पाटील, उत्तम माने, हिदायतुल्ला अजिज वाईकर हे खेळाडू राज्य पातळीपर्यंत चमकले आहेत. मंडळाचे प्रथम अध्यक्ष शंकराप्पा सुसद्दी यांचे काम उल्लेखनीय मानले जाते. ज्ञानू जाधव (व्हॉलीबॉल), उस्मान महमद बागवान (व्हॉलिबॉल व कबड्डी), आप्पा किसन पवार (व्हॉलिबॉल), आकाराम पाटील (व्हॉलिबॉल), गणेश किराणे (कबड्डी), अरविंद फडके (खो-खो), सईद इसाक विजापुरे (बास्केटबॉल) हे राज्य व अखिल भारतीय पातळीपर्यंत चमकलेले खेळाडू होत.

जनार्दन कृष्णाजी तथा श्याम अष्टेकर यांनीही खो-खो व कबड्डी खेळाडू व क्रीडा संघटक म्हणून नाव मिळविले आहे.

## शिल्पकला व चित्रकला

जखिणवाडी, आगाशिव, पांडवगड लेणी येथील बौद्धकालीन लेणीतील कोरीव काम प्राचीन शिल्पकलेचे नमुने होत, तर वाई येथील काशी विश्वेश्वर, काळेश्वर, वाकेश्वर, माहुलीचे बिल्वेश्वर व केदारेश्वर मंदिर, धावडशीचे भार्गवराम मंदिर व चाफळचे नवीन राममंदिर उल्लेखनीय आहे. शिखर-शिंगणापूरचे महादेव मंदिर शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. [सविस्तर माहिती " प्रेक्षणीय स्थळे " या प्रकरणात दिलेली आहे.] हे भूमिज शिखर असलेले यादवकालीन मंदिर आहे.

या नंतरच्या काळात मंदिरातील प्रतिष्ठित देवता, नंदी या व्यतीरिक्त जिल्ह्यात स्वतंत्र अशी पाषाणशिल्पे आढळत नाहीत. ही शिल्पे कोणी घडविली हे ज्ञात नाही. यामध्ये वाई येथील मंदिरांचा उल्लेख करावा लागेल. येथील बहुतांश मंदिरांची वास्तुशैली उत्तर पेशवाईतील काही वैशिष्ट्य दाखवित असली तरी त्यात काही स्थानिय वेगळेपणा जाणवतो. ही मंदिरे वास्तुशिल्पशैलीच्या दृष्टीने नागरशैलीतील (इंडो-आर्यन) भूमिज या माळव्यात उत्पन्न झालेल्या शैलीतील असून तीत काही स्थानिक घटकही आढळतात. त्यात महादेवाच्या मंदिरांचे प्रमाण अधिक आहे. त्यातील वाकेश्वर, त्रिलेश्वर, भद्रेश्वर, सिद्धेश्वर, गंगारामेश्वर, काशी-विश्वेश्वर, काळेश्वर, गोविंद-रामेश्वर आणि महालक्ष्मी, महागणपती, महाविष्णु, साबणेंचा गणपती, कालीमाता ही कलात्मकदृष्ट्या उल्लेखनीय मंदिरे आहेत. काही शिखरांवरील देवळ्यातून चुनेगच्चीत मूर्तिकाम केलेले आढळते. यामधून पेशवेकालीन मूर्तिकलेची कल्पना येते. वाकेश्वर मंदिराच्या पीठावर तसेच मंडोवरावर काही पाषाणशिल्पे आहेत. या काळातील कलाकारांना भारतीय मूर्तिसंभारात आढळणारी वैविध्यपूर्ण मूर्तिपरंपरा पेशवेकालीन कलाकारांनी या मंदिरावर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. [सु. र. देशपांडे, " वाई : मंदिरे, मूर्ती व भित्तिचित्रे ", **लोकहित**, मे , १९९२, पृ. ४७-५७.] सध्या जिल्ह्यात स्थानिक देवदेवतांच्या ओबडधोबड मूर्ती घडविणारे मूर्तिकार आष्टे व तळमावले (ता. कराड) येथे आहेत.

पुणे येथे पेशव्यांच्या आश्रयाखाली चित्रकारीची एक वेगळी शैली उदयास आली आणि ती सातारा, वाई येथे पसरली. ही शैली दोन रूपात प्रगट झालेली दिसते. यापैकी एका रूपात ती मुघल पद्धतीच्या मधुर स्मृती आणि राजस्थानी भावविश्वाला साद घालते तर दुसऱ्या रूपात ती स्थानिक चैतन्य आणि रांगडेपणाचा प्रत्यय आणून देते. या चित्रांचे आलेखन सिद्धहस्ताने झाले असले तरी आकृत्या रेखाटनात काहीसा ताठरपणा जाणवतो. वाईतील काही वाड्यांचा दर्शनी भाग, शयनगृह व दिवाणखान्याच्या भिंती, देवालयांच्या भिंती, शिखर व ओवऱ्यांवर चित्रे काढलेली आहेत. ही चित्रे लघुचित्रण शैलीतील असून ती अठराव्या शतकात काढलेली असावीत. बहुतांश सर्व भित्तिचित्रे अठराव्या शतकातील आहेत. वाईतील

मोतीबाग, बाबा पटवर्धनांचा वाडा, देवकुळे वाडा, रास्ते वाडा, विमलबाई पंडितांचा वाडा, मेणोलीकर जोशींचा वाडा, गोपाळराव देवांचा वाडा, पंचायतन मंदिर, शिव-रामेश्वर मंदिर, पंत राजाज्ञेचा वाडा या ठिकाणी अद्यापही भित्तिचित्रे अवशिष्ट असून पंत राजाज्ञेचा वाडा वगळता उर्वरित सर्व चित्रे १८ व्या शतकातील आहेत. फक्त कोटेश्वर मंदिरातील चित्रे १९ व्या शतकातील असून ही परंपरा सांभळण्याचा प्रयत्न वाईतील काही जुन्या कलाकारांनी केला. त्यामध्ये मोने घराण्याचे नाव उल्लेखनीय ठरेल. [सु. र. देशपांडे, " वाई : मंदिरे, मूर्ती व भित्तिचित्रे ", **लोकहित**, मे , १९९२, पृ. ५५.] सध्या वाईमध्ये सुमारे ५०० भित्तिचित्रे अवशिष्ट असून त्यापैकी २१० चित्रे केवळ मोतीबाग महालात दुसऱ्या मजल्यावर आहेत. त्याचे विषय मुख्यत: पौराणिक आहेत. त्यात **रामायण, महाभारत** यातील प्रसंग विपुल आहेत. दशावतार आणि कृष्णलीलाही रंगविल्या आहेत. रंगपंचमी, गणेशाची मिरवणूक, होलीका उत्सव, फुगडीसारखे खेळ, दरबारातील नाच, काही ठिकाणी पुरुषांचे चित्रीकरण आहे. त्यातून प्रामुख्याने मराठमोळी संस्कृती व्यक्त होते. मेणवलीच्या नाना फडणिसाच्या वाड्यातील भित्तिचित्रे बरीच सुस्थितीत आहेत. [अधिक माहितीसाठी " प्रेक्षणीय स्थळे " पहावे.] येथील चित्रांचे विषय पौराणिक आहेत. मेणवलेश्वराचे देवळात सभा मंडपाच्या गलथ्यावर पेशवाईच्या उत्तर काळात काढलेली रंगीत चित्रे आहेत.

औंधला १९३८ मध्ये बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांनी चित्रसंग्रहालय स्थापन केले. त्यांना चित्रकलेचा मोठा छंद होता. ते स्वत: चित्रकार होते. त्यांच्या चित्राकृती या संग्रहालयात आहेत. अलीकडच्या चित्रकारांमध्ये कराडच्या दादासाहेब सुतारांचा उल्लेख करता येईल. त्यांनी कराडला कलासंगम संस्था स्थापन केली असून स्कूल ऑफ क्रिएटिव्ह आर्ट ही संस्था सुरू केली आहे. चित्रकलेबरोबरच ते शिल्पकलेतही पारंगत आहेत. चित्रकार स. कृ. काळे, सु. पि. अष्टपुत्रे, शिवाजीराव सुतार, वसंतराव गोंधळेकर, ग. श. वंजारी, होनराव, वसंत सकुंडे, शालीवाहन नलावडे या चित्रकारांचा उल्लेख करता येईल.

## परिशिष्ट-१

### महाराष्ट्र गौरव पुरस्कार विजेते

[महाराष्ट्र शासनाने १९९० मध्ये जाहीर केलेल्या यादीवरून.]

विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल शासनातर्फे गौरव पुरस्कार देण्यात आले होते. सातारा जिल्ह्यातील गौरव पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा खाली उल्लेख केलेला आहे.

| नाव<br>(१) | वर्ष<br>(२) | पुरस्काराचा प्रकार<br>(३) |
|---|---|---|
| **राज्य पुरस्कार :-** | | |
| एस.आर. धारवाडकर | १९७६ | खो-खो (क्रीडा) |
| यमुनाबाई वाईकर | १९७८ | तमाशा-महाराष्ट्र गौरव नाट्य अकादमी. |
| लक्ष्मण माने | १९८१ | साहित्य-अकादमी |
| कृष्णराव साबळे | १९८४ | शाहिरी-महाराष्ट्र शाहीर |
| **राष्ट्रीय सेवा विशेष पुरस्कार :-** | | |
| आबा कीर्तकुडे | १९४८ | वीर चक्र (गॅलन्ट्री) |
| लक्ष्मणराव सिधू साळूंके | १९६५ | भारत-पाक युद्ध-वीर चक्र (गॅलन्ट्री) |
| सतिष एम. शिंदे | १९६९ | शौर्य चक्र (मरणोत्तर) |
| हनुमंत कृष्णा मोरे | १९७१ | भारत-पाक युद्ध-वीर चक्र (गॅलन्ट्री) |
| विश्वनाथ भोसले | १९७१ | भारत-पाक युद्ध-वीर चक्र (गॅलन्ट्री) |
| आनंद सोपान सावंत | १९८० | शौर्य चक्र |
| तुकाराम जाधव | १९८५ | शौर्य चक्र |

अनुक्रमणिका

## परिशिष्ट-२

समर्थ रामदास स्वामींचे छत्रपती संभाजीस उपदेशपर पत्र

**शिवरायास आठवावे**

अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें
तजविजा करीत बसावें । एकांत स्थळीं (१)
कांही उग्रस्थिती सांडावी । कांही सौम्यता धरावी
चिंता लागावी परावी । अंतर्यामीं (२)
मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे
सुखी करूनि सोडावे । कामाकडे (३)
पाटवणी तुंब निघे ना । तरी मग पाणी चाले ना
तैसे सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे (४)
जनाचा प्रवाह चालला । म्हणजे कार्यभाग आटोपला
जन ठाईं ठाईं तुंबला । म्हणजे खोटें (५)
श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठी भांडत बैसले
मग जाणावें फावलें । गलीमांसी (६)
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यासी जय
धीर धरोन महत्कार्य । समजून करावें (७)
आधींच पडलीं धास्ती । म्हणजे कार्यभाग होय नास्ती
याकारणें समस्तीं । बुद्धि शोधावी (८)
राजी राखंता जग । मग कार्यभागाची लगबग
ऐसें जाणोनियां सांग । समाधान राखावें (९)
सकळ लोक एक करावे । गलीम निवटून काढावे
ऐसें करितां कीर्ती धावे । दिगंतरी (१०)
आधीं गाजवावे तडाके । मग भूमंडळ धाके
ऐसे न होतां धक्के । राज्यास होती (११)
समय-प्रसंग ओळखावा । राग निपटून काढावा
आला तरी कळों न द्यावा । जनांमध्यें (१२)
बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावे
कष्टें करोनि घसरावें । म्लेंछावरी (१३)
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें
महाराष्ट्रराज्य करावें । जिकडे तिकडे (१४)
लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तरवार करावी
चढती-वाढती पदवी । पावाल येणें (१५)
शिवरायास आठवावें । जीवित्व तृणवत मानावें
इहलोकीं-परलोकीं राहावें । कीर्तिरूपें (१६)
**शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप**

अनुक्रमणिका

**शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी (१७)**
**शिवरायाचें कैसे चालणें । शिवरायाचें कैसें बोलणें**
**शिवरायाची सलगी देणें । कैसी असे (१८)**
सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग
राज्यसाधनाची लगबग । कैसी असे (१९)
त्याहूनि करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष
याउपरीं आतां विशेष । काय ल्याहावें ? (२०)

(**संदर्भ :** वि. कृ. पटवर्धन. **रामदास रसवंती**, पुणे, १९६५ पृ. २००-०१)

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका